म. ग्रं. सं. ठाणे

विषय

संग्रहालय क्रमांक

लेखक : आर्यभूषण
प्रेस, पुणे

पुस्तकाचें नांव [illegible]

35

सन

# चार्लस ... एम पी

... चरित्र.



...

...र्थ... ... पारी... केलें.

...

# मि॰ चार्लस ब्राडला, एम. पी.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे



पिबन्ति नद्यः स्वयमेव नाम्भः स्वयं न खादन्ति फलानि वृक्षाः।
नाश्नन्ति शस्यं खलु वारिवाहाः परोपकाराय सतां विभूतयः॥

---

भागीरथी, यमुना, ब्रह्मपुत्रा वगैरे महानद्या सर्वकाल मधुर जलानें परिपूर्ण असतात, परंतु त्यांच्या उदकाचा उपयोग स्वतःस होत नसून पिपासाकुल लोकांच्या तृषाशमनार्थ, भाविक लोकांच्या पापमार्जनार्थ, व कृषीवलांच्या क्षेत्रगत शस्यपरिपाकार्थ होतो. आम्रवृक्षासारखे तरुवर अमृतरसमय अशा फलांचा भार केवळ तदास्वादाभिलाषी जनांकरितां वाहतात. समुद्राच्या क्षारजलाचें बाष्परूपानें ग्रहण करून मेघ त्यास मधुर करून त्याचा सेक सर्व क्षेत्रांवर केवळ क्षेत्रिकांच्या श्रमसाफल्यार्थ

करितात. त्याचप्रमाणें सज्जन जे आहेत ते आपलें तनमनधन व सर्व ऐश्वर्य लोकोपकारार्थ खर्च करितात. याच कोटींतले पार्लमेंटचे सभासद् चार्लस ब्राडला हे आहेत असें ह्मटलें असतां अतिशयोक्ति होणार नाहीं. आपण क्षणभर असा विचार करूं कीं, ब्राडलासाहेब कोण व आपण कोण! सुधारणेच्या उच्च कोटीप्रत पोहोंचलेला व संपन्नतेच्या पराकाष्ठेप्रत पावलेला असा जो इंग्लंड देश, तेथील राज्यसूत्रें जिच्या पूर्णपणें हातांत आहेत अशी जी संसद्, तिचे सभासद् ब्राडलासाहेब–व आह्मीं अभिभूत व अतएव मन्दभाग्य अशा आर्यभूमीचे हतवीर्य व परावलंबनानें निर्गतसत्व व प्रभुसेवेंतच कृतकृत्यता मानणार पुत्र–तेव्हां कः केन संबन्धः? या साहेबांनीं आमच्याविषयीं कळकळ कां बाळगावी व दीर्घ प्रवासाचे आयास सोसून आपल्या देशाची भेट कां घ्यावी? जगामध्यें नेहमींच्या व्यवहारांत आपल्यास असें दिसून येतें कीं कृतघ्न लोकांची संख्या फार. उपकार केलेले न स्मरणें ह्मणजे एक साधारणच गोष्ट होऊन गेली आहे. कृतज्ञ लोकांची संख्या कमी, ह्मणजे उपकारी जनांवर प्रत्युपकार करणारे थोडे. परंतु केवळ उपाधिनिरपेक्ष व स्वार्थाचा ज्याच्यामध्यें लेशही नाहीं अशा प्रकारें ज्यांस परकृत्य करण्याचें व्यसन लागलें आहे असे लोक अगदीं विरळ, व ह्मणून तेच सज्जन, तेच उदारसत्व, तेच महात्मे व तेच पूज्य असें ह्मणण्यास हरकत नाहीं. व अशा जनांमध्यें साहेब महशुफांची गणना करावी किंवा नाहीं हें ज्यांनीं ह्मणून त्यांनीं अलीकडे पार्लमेंटांत आस्थापूर्वक चालविलेल्या खटपटीची हकीकत वाचली असेल त्यांस सहज सांगतां येईल. अथवा यांत आश्चर्य तें कोणतें? यांच्यासारख्यांनीं परानुग्रहतत्पर असावें हें योग्यच आहे. कारण कीं अशी तत्परता वृक्षकोटींतही आढळते. कवीनें ह्मटलें आहे:

> किमत्र चित्रं यत्संतः परानुग्रहतत्पराः
> न हि स्वदेहशैत्याय जायन्ते चन्दनद्रुमाः।

त्याचप्रमाणें देशभेद वगैरे गोष्टींनीं केवळ लघुचेतसांच्या वृत्तीवर परिणाम होतो. परंतु जे उदारचरित आहेत त्यांची सर्व वसुधा ही कुटुंबच आहे. तेव्हां आपल्या आगमनानें ब्राडलासाहेबांनीं आपल्या सौजन्याचा पूर्ण प्रत्यय आह्मांस दिला यांत आश्चर्य नाहीं. प्रकृतीस आराम

नसतां केवळ प्रतिपन्न कार्याचा निर्वाह करण्याच्या हेतूनें या साहेबांनीं आमच्या भूमीकडे धांव घेतली व आत्मकार्याविषयीं अनादर करून परहितनिरतीचा मासला आमच्यासारख्या अवनत प्रजेस दिला हे त्यांचे आपल्यावर मोठे उपकार आहेत. तेव्हां अशा प्रसंगीं या पुरुषाच्या चरित्रांतील कांहीं भाग आमच्या वाचकांस सादर करण्याचा आमचा विचार आहे. या चरित्रकथनांत ज्या ज्या गोष्टी येतील त्यांपासून आपणांस महणीय असा काय उपदेश आहे, याचा उल्लेख अखेरीस करण्यांत येईल.

ब्राडलासाहेब हे लंडन शहराच्या पूर्वप्रांतीं २८ सप्टेंबर १८३३ रोजीं जन्मले. यांची घरची स्थिति फारच गरिबीची होती. यांचे वडील एका वकिलाचे कारकून होते; परंतु त्यांची मिळकत इतकी थोडी होती कीं त्यांस त्यांचा लहानसा संसार चालविण्याची पंचाईत पडे. यांस सातवे वर्षीं बापानें शाळेंत घातलें, व आपल्या वयाच्या बारा वर्षांपर्यंतच यांनीं विद्याभ्यास केला. बारावे वर्षीं ज्या वकिलाजवळ यांचा बाप नोकर होता त्या वकिलाच्या कचेरींत यांस त्यानें नोकरी लावून दिली. तेथें त्यांनीं दोन वर्षें काम केलें व तेवढ्या अवधींत त्यांनीं आपलें अक्षर सुधारलें व कायद्याचेंही थोडेंबहुत ज्ञान संपादिलें. चवदावे वर्षीं यांस बंदरावर कारकुनाची नोकरी मिळाली. येथें यांस काम फार नसे व फुरसतीच्या वेळांत हे जवळपास कोठें उपदेश किंवा संभाषण चालूं असल्यास तेथें जात असत. यांचा बाप फार धार्मिक असे, व सकुटुंब भजनालयांत जाण्याचा त्याचा नियम असे. प्रथमतः बापाचेंच वळण मुलास लागलें व तोही मोठा श्रद्धालु व उपासनादक्ष झाला व त्यामुळें रविवारीं धर्मविषयक शिक्षण देण्यासाठीं ज्या शाळा भरत असत त्यांमध्यें अध्यापकाचें काम याजवर सोंपविलें होतें. परंतु असा क्रम फार दिवस टिकला नाहीं. तेथील धर्मगुरूच्या मनांत कांहीं नवीन लोकांस धर्माध्यक्षांच्या हातून दीक्षा देण्याचा समारंभ करावा असें आलें. त्या समयीं ब्राडलासाहेब फार हुशार व स्वकार्यदक्ष ह्मणून त्यांवरही अनुग्रह व्हावा असा त्याचा मनोदय होता ह्मणून त्यांनीं त्यांस धर्मग्रंथांतील कांहीं विशिष्ट भागांचें अध्ययन करण्यास सांगितलें. निर्दिष्ट भागाच्या परिशीलनानें समाधान होईना ह्मणून ब्राडलासाहेबांनीं इतर ग्रंथांचें अवलो-

कन आरंभिलें व जेव्हां कांहीं गोष्टींचा मेळ त्यांस घालतां येईना तेव्हां त्यांनीं धर्मगुरूस प्रश्न घातले व समाधानकारक उत्तर देतां येईना ह्मणून "शेषं कोपेन पूरयेत्" या न्यायानें त्यांनीं यांच्या बापाजवळ हा पाखंडी आहे अशी कागाळी केली, व हा आपल्या वर्तनानें इतरांस बिघडवील ह्मणून त्यास तीन महिने शिक्षकाच्या कामावरून दूर केलें. या फुरसतींत ब्राडला साहेब सर्व प्रकारच्या उपदेशकांचीं भाषणें ऐकावयास जात व तेव्हांपासूनच त्यांच्या मनांत "स्वतंत्र विचारा" चा अंकुर उद्भवला असें ह्मणण्यास हरकत नाहीं. परंतु येवढें करूनच धर्मगुरु स्वस्थ बसले नाहींत. त्यांनीं यांच्या बापास सांगून यास आपल्या धर्ममतांचा निश्चय करण्यास तीन दिवसांची मुदत दिली, व त्या मुदतीच्या आंत जर त्यांनीं आपल्या पाखंडमताचा त्याग केला नाहीं तर त्यांस घरांतून घालवून देण्याची व नोकरीवरून काढून टाकविण्याची दहशत घातली. परंतु हे गृहस्थ डगमगले नाहींत. त्यांनीं अंगीकृत मतांचें अवलंबन करून आपल्या घरादारावर व नोकरीवर पाणी सोडिलें. याप्रमाणें कोंवळ्या वयांतच त्यांस संसारसागरांत निःसहाय गटंगळ्या खाण्याचा प्रसंग आला. लंडनसारख्या शहरांत दीनवाणें फिरण्याची त्यांवर पाळी आली. खिशांत दमडी नाहीं. खाण्यास अन्न नाहीं व रहाण्यास जागा नाहीं. अशा प्रसंगीं एका गृहस्थानें यांची चाकरी मिळेपर्यंत रहाण्याची सोय केली. नंतर यांनीं जवळपासच्या लोकांस कोळसे पुरविण्याचें काम पतकरिलें. परंतु हाही क्रम निर्वेध चालला नाहीं. यांच्या ग्राहकांमध्यें एक रोट्या तयार करणारी बाई होती. तिच्या कारखान्यांत कोळशांचा खप फार असे व त्यावर दर आठवड्यास १० शिलिंग मिळत असत. परंतु आपला कोळसेविक्या नास्तिक आहे अशी गुणगुण जेव्हां त्या बाईच्या कानांवर आली तेव्हां तिनें यांजपासून कोळसे घेण्याचें नाकारिलें व त्यामुळें हा व्यापार बंद पडला. तेव्हां त्यांनीं धीर न सोडतां दुसऱ्या कांहीं उद्योगाची खटपट केली. 'स्वतंत्र विचार' (Free thought) मताच्या अनुयायिमंडलामध्यें त्यांचे बरेच स्नेही झाले होते. त्यांपैकीं एक कमरपट्टे, बाद्या वगैरे जिनसांचा व्यापार करीत असे. त्यानें ब्राडला साहेबांस आपल्या गुमास्त्याची जागा दिली व मालाच्या

विक्रीप्रमाणें मजूरी देण्याचें कबूल केलें. परंतु माल खपला न खपला तरी सकाळसंध्याकाळ तो त्यांची भोजनाची तरतूद ठेवी. याप्रमाणें दिवसा उद्योगांत काळ घालवून रात्रीं ते काफीपानगृहांत जात असत. त्या समयीं लंडनशहरांत नानामतांच्या लोकांचीं जमण्याचीं ठिकाणें हींच असत व येथें रोज कांहीं तरी विषय उपस्थित करून त्यावर जमलेल्या लोकांनीं वादविवाद करण्याची चाल असे. ह्या ठिकाणींच ब्राडला साहेबांचें वाक्पटुत्व प्रथम निदर्शनास आलें व तेव्हांपासूनच त्यांस प्रसंग येई तेव्हां उपदेश व संभाषण करून मंडळीचें मतान्तर करविण्याचा यत्न करण्याचा नाद लागला. याच वेळेस त्यांनीं फ्रेंच वगैरे भाषांचा अभ्यास सुरू केला. कार्लाईल नांवाच्या एका कुटुंबामध्यें ते रहात असत. तेथें एका मुलीवर त्यांचें प्रेम जडलें, परंतु मुलीकडून त्यांस कांहींच उत्तेजन मिळालें नाहीं, तेव्हां त्यांनीं तो नाद सोडला; इतक्यांत कांहीं लहानसान बाबतींत त्यांस चारपांच पाउंड कर्ज झालें. त्यामुळें त्यांच्या मनास फार अस्वस्थता वाटली. त्यांच्या मतानुयायी मंडळीनें वर्गणी करून हें कर्ज फेडण्याचें मनांत आणलें. परंतु ही गोष्ट जेव्हां ब्राडला साहेबांस कळली तेव्हां त्यांस जास्तच दुःख झालें व अशा दैन्याचा प्रतीकार करणें अत्यावश्यक असें त्यांस वाटून त्या उपायास ते लागले; व ज्या कुटुंबांत ते रहात होते त्यांतील माणसांस न विचारतां घरांतून बाहेर पडले. रस्त्यांतून फिरतां फिरतां त्यांच्या नजरेस एक मोठी जाहिरात पडली. या जाहिरातींत असा मजकूर होता कीं ईस्ट इंडिया कंपनीच्या लष्करी खात्यांत कांहीं नवे लोक पाहिजे आहेत व जे उमेदवार कबूल होतील त्यांस प्रथमारंभींच बक्षिसादाखल साडेसहा पाउंड मिळतील. प्रथमदर्शनींच त्यांच्या मनांत असा विचार आला कीं आपलें कर्ज फेडून टाकण्यास ही संधी चांगली आहे, म्हणून एकदम निर्दिष्ट ठिकाणीं ते दाखल झाले. तेथील अधिकाऱ्यांनीं त्यांस पुष्कळ भर दिली व त्यांस प्रथम ईस्ट इंडिया कंपनीची नोकरी देण्याबद्दलची आशा दाखवून पुढें त्यांस फसविलें व विलायती पलटणींतच त्यांची योजना केली. यामुळें त्यांस फार संताप आला व तंटा उपस्थित करण्याच्या ते रंगांत होते; इतक्यांत ज्या डाक्तराकडे ते परीक्षा देण्यास गेले होते त्या डाक्टरानें मोठ्या युक्तीनें त्यांची समजूत घातली म्हणून मजल फार लांब गेली

नाहीं. यांच्याबरोबर दुसरी जी मंडळी निवडली गेली ती सुशिक्षित नसून अप्रबुद्ध, आडदांड व हेकेखोर अशी होती. यांच्या बरोबरच त्यांची आयर्लंडास रवानगी झाली. या सर्व मंडळीमध्यें ब्राडला साहेबांचा पोषाख साधारण शोकीचा होता. पण ही गोष्ट त्यांच्या सोबत्यांस आवडली नाहीं. फौजेंत नोकरी पतकरल्यावर अशा प्रकारची नोकझोंक करणें त्यांच्या मीदाशीं अगदींच विसंगत होतें. त्यांची समजूत अशी कीं फौजेंत नोकरी मिळाल्याबरोबर माणसानें आपला सर्व कपडालत्ता विकून त्या पैशाची दारू व तंबाखू घ्यावी व आपल्या स्नेहीजनांसमवेत त्याचा उपभोग घ्यावा. या तत्वास अनुसरून ब्राडला साहेबांनीं आपलें वर्तन ठेविलें नाहीं ह्मणून त्यांच्या मित्रवर्गास सहजच राग आला व त्यांनीं त्यांची चेष्टा करण्याचा उपक्रम केला. ब्राडला साहेबांची मुखचर्या फारशी मनोहर नाहीं. दिसण्यांत मुद्रा ओबडधोबड व आकृति न शोभण्यासारखी उंच व पहाणाऱ्याच्या मनांत फारसा अनुकूल ग्रह करण्यासारखी नसल्याकारणानें त्यांच्या बरोबरच्या मंडळीस त्यांचा फार तिटकारा आला व त्यांनीं त्यांची टर आरंभिली. त्यांनीं त्याचें गांठोडें उसकटून पाहिलें व त्यांत एक आरबी व एक ग्रीक पुस्तक जेव्हां त्यांस दृष्टीस पडलें तेव्हां त्यांस फार विस्मय वाटला, व त्या पुस्तकांचे त्यांनीं चेंडू बनवून ते लाथांनीं उडवूं लागले. ब्राडला साहेबांत शिपाईगिरीची ऐट फारशी नसल्यामुळें त्यांस प्रतिबंध करतां येईना. मोठ्या शर्थीनें त्यांचीं पुस्तकें परत त्यांच्या हातीं लागलीं व त्या प्रसंगाची स्मारक ह्मणून अजूनही त्यांनीं आपल्या जवळ तीं बाळगलीं आहेत. या सफरीमध्येंच एकदां मोठें तुफान झालें. तेव्हां जहाज समतोल राखण्यासाठीं जहाजांतील माल ठिकठिकाणीं सोईप्रमाणें ठेवावा असें कप्तानाच्या मनांत येऊन त्यानें या सैनिक मंडळास कांहीं बक्षिस देण्याचें कबूल करून त्यांची मदत घेतली. पुढें वादळ संपलें तेव्हां कप्तानास कबूल केलेलें बक्षिस देणें जिवावर येऊन त्यानें त्या मंडळींतील दोनचार सशक्त व दांडग्या माणसांस तेवढें थोडेंसें बक्षिस दिलें व बाकीच्यांस तसेच चुरमुरे खावयास लाविलें. हें कृत्य ब्राडला साहेबांस पसंत न होऊन त्यांनीं जहाजावरची सर्व मंडळी जमा करून कप्तानाची निर्भर्त्सना

करण्यास आरंभ केला. भाषण इतक्या आवेशानें व शिताफीनें केलें कीं तें ऐकून सर्व मंडळी थक्क झाली व ब्राडला साहेबांची वहावा करूं लागली. शिवाय ब्राडला साहेबांनीं अशी दहशत घातली कीं 'टाईम्स' वर्तमानपत्रांत मजकूर लिहून पाठवून वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या कानावर ही हकीकत घातल्याशिवाय सोडणार नाहीं. तेव्हां कप्तान भिऊन गेला व त्यानें कबूल केलेली रक्कम सर्वांस वांटून दिली. या प्रसंगामुळें यांजवर सर्व सोबत्यांची मोठी प्रीति बसली. हे नेहेमीं मद्यपाननिषेधावर व्याख्यानें देत; परंतु शिपाईगिरीला आवश्यक जे गुण ते यांच्या अंगीं नव्हते व अभ्यासानेंही ते येण्याचा रंग त्यांस दिसेना. कवाइतीची टापटीप न साधल्यामुळें त्यांस ती फार कंटाळवाणी झाली. भाला, बोथाटी वगैरे त्यांस साधेना. घोड्यावर बसण्याचीही पंचाईत. एकदां मात्र त्यांनीं द्वंद्वयुद्धामध्यें एका सोबत्याची खोड जिरविली होती. तेव्हांपासून सर्व मंडळी त्यांना बरीच वचकून असे. सर्व मंडळीमध्यें हेच सुशिक्षित असल्यामुळें कोणाचीं पत्रें लिहून दे कोणास कांहीं कायद्याच्या गोष्टी समजून सांग अशी कामगिरी यांजकडे येई, व या कामगिरीबद्दल ती मंडळी यांचें सर्व सामान साफसूफ करीत व यांच्या घोड्याची खिजमत करीत. पलटणींत अशी चाल आहे कीं एक गांव सोडून दुसऱ्या गांवीं जाण्याच्या अगोदर दुसऱ्या मुक्कामासाठीं लांकूडफाट्याची तजवीज पहिल्या मुक्कामींच करावयाची. या चालीप्रमाणें एका प्रसंगीं बाकी सर्वांनीं आपली तजवीज केली होती; परंतु ब्राडलासाहेबांस ही चाल माहित नसल्याकारणानें दुसऱ्या मुक्कामीं पोहोंचल्यावर लांकूडफाट्याची त्यांस पंचाईत पडली. तेव्हां इकडे तिकडे हिंडून जेव्हां अपेक्षित वस्तूचा लाभ झाला नाहीं तेव्हां या साहेबांनीं बेलाशक एक कुत्र्याचा पिंजरा होता त्यांतील कुत्रा सोडून देऊन तो जाळण्याकरितां घेऊन आले. या धृष्टपणाच्या कृत्याबद्दल मंडळीनें तोंडांत बोटें घातलीं. पुढें यांची पलटण डब्लिन मुक्कामीं गेली तेव्हां आपला पराक्रम दाखविण्याची साहेबांस चांगली संधि आली. तेथील मद्यनिषेधक मंडळीच्या वतीनें यांनीं नेहेमीं भाषणें करावीं. असा क्रम चालल्यामुळें दिवसानुदिवस मोठमोठ्या लोकांशीं यांचा परिचय होऊं लागला. कधीं कधीं

या सभांस जाण्याला पलटणीच्या अधिकाऱ्यांकडून परवानगी मिळत नसे तेव्हां या साहेबांनीं खिडकींतून दोऱ्या लावून खालीं उतरावें परंतु व्याख्यानाची संधि चुकूं देऊं नये. या गोष्टीस त्यांच्या स्नेह्यांचें चांगलें साहाय्य असे. कांहीं दिवसांनीं यांची कारकुनाच्या जागेवर नेमणूक झाली तेव्हां कवाइतीच्या वगैरे सर्व त्रासांतून हे सुटले. मद्य-निषेधाशिवाय दुसऱ्याही विषयावर हे साहेब बोलत असत, परंतु नेहेमीं जनसमुदाय आपल्याकडे वळवून घेण्याची हातोटी त्यांस चांगली साधे; तथापि एकंदरीनें या आयुष्यक्रमाचा त्यांस फार कंटाळा आला व लष्करी नोकरीच्या प्रतिबंधांतून सुटण्याविषयीं त्यांस फार आतुरता प्राप्त झाली; परंतु त्यांस कांहीं तोड सुचेना. पलटणींत असतांनाच त्यांचे वडील निवर्तले. पण कर्मधर्मसंयोग असा आला कीं १८५३ सालीं त्यांची एक मावशी वारली व तिनें आपल्या मृत्युपत्रांत आपल्या भाच्याला कांहीं रकम दिली. तेव्हां तिच्यापैकीं कांहीं पैसे खर्च करून यांनीं आपली सुटका करून घेतली व लंडनांत परत आले. बाकी राहिलेल्या पैशावर कांहीं दिवस चरितार्थ चालला. परंतु पैसे संपल्या-वर फिरून पंचाईत येऊन पडली. तेव्हां फिरून नोकरीच्या उद्योगास साहेब लागले. आपल्या वडिलांच्या ओळखीच्या वकिलांकडे यांनीं बऱ्याच खेपा घातल्या, परंतु कांहीं लाभ झाला नाहीं. एके दिवशीं राजर्स नांवाच्या वकिलाकडे गेल्यावर त्या वकिलांनीं कारकुनाची जागा रिकामी नाहीं ह्मणून सांगितलें, परंतु हरकाम्याच्या जागेवर एक माणूस पाहिजे आहे असें सांगितलें. तेव्हां यांनीं उलट प्रश्न केला कीं पगार काय द्याल ? दर आठवड्यास दहा शिलिंग, असा जबाब मिळाल्याबरोबर यांनीं नोकरी पतकरली. यांना कयद्यांची वगैरे माहिती होतीच; तेव्हां यांनीं आपल्या बुद्धिबलानें आपली तेव्हांच छाप पाडली व थोड्याच दिवसांत कारकुनीचें काम पाहूं लागले व कांहीं दिवसांनीं मुख्य कारभारी झाले. आपलें काम करून यांस जी फुरसत सांपडे तींत हे दुसरें कांहीं काम करून पैसे मिळवीत व शिवाय लंडन शहराच्या पूर्व भागांत गरीब लोकांच्या वस्तींत उपदेश करीत व व्याख्यानें देत; परंतु हाही क्रम अबाधित चालूं देणें

यांच्या शत्रूंस खपेना; ह्मणून यांच्या नास्तिकपणाबद्दल यांच्या [illegible] मानाकडे लोकांनीं कागाळ्या केल्या परंतु राजसनें [illegible] यांच्या यजनाहीं व असें सांगितलें कीं माझ्या कामास व्यत्यय येऊं न देतां [illegible]लेख दिलें केलें असतां माझी हरकत नाहीं. तेव्हांपासून " आयकोनोक्लास्ट " या नांवाखालीं ते लोकांत बोलण्याचा व लिहिण्याचा व्यवहार करूं लागले. त्यांच्या प्रथमच्या बहुतेक लेखाचा व व्याख्यानाचा विषय ख्रिस्ती धर्मपुस्तकें असून त्यांसंबंधीं ते फारच खरमरीत टीका करीत त्यामुळें त्यांच्या पक्षाचे लोक जितके त्यांस चाहूं लागले तितकेच श्रद्धाळू लोक त्यांचा द्वेष करूं लागले. परंतु एकंदरीनें दिवसानुदिवस यांच्या पक्षाला जास्ती लोक येऊन मिळत चालले. शिवाय गरीबगुरीबांस त्यांच्या न्यायपटुत्वाचा फार उपयोग होई व यामुळें ते लोक बरेच यांच्या अनुसंधानानें असत. एकदां एक विलक्षण प्रसंग घडून आला त्यामुळें तर यांची फारच वाहवा झाली. कांहीं लोकांनीं वर्गणी जमा करून सर्वांच्या उपयोगासाठीं एक इमारत बांधिली होती. परंतु ज्या जागेवर ही इमारत बांधली गेली त्या जागेच्या मालकाशीं कांहीं करारमदार झाले नव्हते. इमारत तयार होईतोंपर्यंत जागेच्या मालकानें अगदीं हरकत केली नाहीं, परंतु नंतर कांहीं क्षुल्लक कारणावरून त्यानें तंटा उपस्थित केला व इमारतीवरही आपला हक्क सांगूं लागला. तेव्हां त्या लोकांस मोठी पंचाईत पडली व त्यांनीं ब्राडला साहेबांची सल्ला विचारली. जेव्हां कोणत्याही अटी मालकास कबूल होईनात तेव्हां ब्राडला साहेबांनीं एक युक्ति लढविली. शें दोनशें लोक जमा करून थोड्या अवकाशांत इमारत मोडून सर्व सामान पळवून न्यावयास सांगितलें. त्याप्रमाणें लोक उद्योगास लागले असतां मालकास बातमी समजली तेव्हां तो स्वतः निषेध करण्यासाठीं तेथें आला परंतु त्यांस कोणी दाद दिली नाहीं व मोठ्या आदरानें एखादें कौल किंवा वीट डोक्यावर पडेल ह्मणून दूर उभें रहाण्यास सांगितलें. इकडे यांचें काम जारीनें सुरूच होतें. इतक्यांत पोलिसचे शिपाई आणिले तरी त्यांस प्रतिबंध करण्याचा अधिकार नाहीं असें ब्राडला साहेबांनीं साफ सांगितलें. तेव्हां मालक आपल्या वकिलाकडे गेला व कोर्टांत हुकुमनाम्यासाठीं अर्ज

करावयास त्यांस सांगितलें. परंतु कायद्याच्या सर्व भानगडींचा निर्वाह होऊन हुकूम बजावण्याची तयारी होईतोंपर्यंत सर्व इमारतीचें सामान नाहींसें झालें व जमिनीच्या मालकासाठीं जमीन मोकळी करून मंडळी स्वस्थ झाली. या सर्व कृत्यांत ब्राडला साहेबांची सल्ला मात्र, बाकी सर्व कार्यभाग इतरांनींच उचलला होता. या कामांत साहेबमहशुफांचें न्यायशास्त्राचें ज्ञान, त्यांची काम उरकण्याची शैली व गरीब लोकांकरितां कळकळ इतके गुण चांगले निदर्शनास आले.

याच संधीस या साहेबांनीं मिस हूपर नांवाच्या एका मुलीशीं विवाह लावला. या संबंधापासून यांस तीन अपत्यें झालीं. दोन मुली अजून जिवंत आहेत व एक मुलगा लहानपणींच मरण पावला. या जोडप्याचा व्यवहार फार दिवस सुरळीत चालला नाहीं व कांहीं दिवसांनीं हीं परस्परांपासून विभक्त झालीं. यांची पत्नी १८७५ सालीं मरण पावली.

१८५५. सालीं ब्राडलासाहेबांनीं राजकीयविषयांसंबंधीं बोलण्याचा व लिहिण्याचा उपक्रम केला. त्यांनीं आरंभिलेल्या कृत्यास तो समयही फार अनुकूल होता. प्राकृत जनांस योग्य अशा नायकाची फार आवश्यकता होती. पूर्वीं ज्यांनीं नायकत्व स्वीकारलें होतें ते लोक एकामागून एक असे कारणपरत्वें मार्गे पडले व त्यांची रिकामी पडलेली जागा मिळविण्याची संधि चांगली आहे असें जाणून ब्राडलासाहेबांनीं उद्योगास सुरुवात केली. अशा प्रकारचा कार्यभार घेण्याचें सामर्थ्य त्यांच्या अंगीं होतें. ऐन तारुण्याचा वयःकाल, धिप्पाडशरीर, उत्साहवैपुल्य, ज्ञानसंपन्नता, तीव्रमतित्व, देशकालज्ञान, अनुपम वाक्पटुत्व, अनन्यविषयक उद्योगशीलत्व, ऐकान्तिक कार्यनिष्ठा इत्यादि जेवढे ह्मणून गुण प्रजाग्रणीत्वाला आवश्यक तेवढे त्यांच्यामध्यें होते. या गुणसमवायामुळें ते बोलण्यास उभे राहिले ह्मणजे ऐकणारांवर त्यांची छाप फार बसे. त्यांच्या खणखणीत आवाजांत क्षुद्र जनांचे निन्दाव्यंजक किंवा असंमतिप्रदर्शक उद्गार यांचा लोप होत असे. त्यांची कार्यनिष्ठा त्यांच्या अभिनयांत चांगल्या प्रकारानें व्यक्त होई व त्यामुळें श्रोतृसमाजास आकर्षण करण्यास कारणीभूत होत असे. शरीरसौष्ठवाचें त्यांस आनुकूल्य नव्हतें. यांचें डोकें मोठें, नाक बोजड व चेहेरा उग्र, परंतु

असें असतांही त्यांच्यामध्यें अशी एक काहीं विलक्षण खुबी असे कीं तिच्या योगानें ते श्रोतृजनांस जणूं काय जादू घालूनच भारून टाकित.

अशा कारणसमवायास आंखी [illegible] भर पडली; त्यामुळें ब्राडलासाहेबांचें नांव फारच विख्यात झालें. रविवार हा पूर्णपणें विश्रान्तीचा दिवस म्हणून त्या दिवशीं सर्व प्रकारचा व्यवहार बंद करावा अशाविषयीं हालचाल सुरु झाली व पार्लमेंटसभेंत एक कायद्याचा मसुदा मसूद झाला. यापूर्वी पुष्कळ वर्षांपासून यासंबंधीं लोकांत अस्वस्थता उत्पन्न झाली होती. फळें विकणाऱ्या बायांस फळें विकूं देऊं नये, न्हाव्यास हजामत करूं देऊं नये, वर्तमानपत्रें विकणारांस पत्रें विकूं देऊं नयेत; याप्रमाणें लोकांस बराच त्रास झाला होता; व जेव्हां तो असह्य झाला तेव्हां त्या सर्व लोकांनीं कट करून माजिस्ट्रेट लोकांच्या गाड्या हांकणारांवर फिर्याद केली व असा मुद्दा काढला कीं गाडी हांकणें हा या लोकांचा नेहमींचा धंदा, व नेहमींचा धंदा रविवारीं करावयाचा नाहीं तेव्हां त्या दिवशीं गाड्या हांकण्याची मनाई असली पाहिजे. असें झालें तेव्हां मोठ्या लोकांस मोठी हरकत आली व कायद्याची अंमलबजावणी नरम पडत चालली; परंतु त्याच विषयाची पुनः उपस्थिति करण्यासाठीं लार्ड ग्राव्हनर साहेबांनीं नवा कायदा करण्याची वाटाघाट सुरू केली, व हा कायदा पूर्वीपेक्षांही सक्त करण्याचा त्यांचा विचार होता. केवळ मद्याचाच विक्रय बंद करून त्यांचें समाधान झालें नाहीं; तर गरीब लोकांची खाद्य सामुग्री तयार करण्याचीं दुकानेंही त्या दिवशीं बंद असावीं असा त्यांचा कटाक्ष होता. तेव्हां अर्थातच लोकांत फार गवगवा झाला. लोक संतापून गेले. कांहीं लोकांनीं व्याख्यानें देऊन व कांहींनीं लहान लहान पुस्तकें लिहून होत असलेल्या जुलुमाचें स्वरूप लोकांस स्पष्ट रीतीनें भासविण्याचा यत्न केला. होलीओक नावाच्या गृहस्थानें "श्रीमंतांचा रविवार व गरीबांचा रविवार" या नांवाचें पुस्तक काढलें त्याच्या लाखो प्रती खपल्या. जेव्हां प्रजाजनांचा संक्षोभ उच्चकोटीप्रत पोहोंचला तेव्हां भररस्त्यांत श्रीमंत लोकांची टर उडविण्याचा क्रम सुरू झाला. २४ जून १८५५ रविवार रोजीं "हाईडपार्क" नामक विस्तीर्ण उद्यानभूमिका लंडन शहराच्या पश्चिम भागांत आहे तेथें प्रस्तुत काय-

याच्या विरुद्ध मत प्रदर्शित करण्यासाठीं असंख्य लोकसमाज जमला त्यावेळीं उद्यानांतून जाणाऱ्या अमीरउमरावांसमक्ष निन्दाव्यंजक असे सीत्कार लोकांनीं काढले. त्याच्या पुढल्या रविवारीं आणखी एकदां समाज जमला. तेव्हां पोलिसांनीं अशी थाळी पिटविली कीं अशा प्रकारची सभा भरविणें हें कायद्याविरुद्ध आहे व सभा भरली असतां ती मोडण्यात येईल. ब्राडला वगैरे न्यायविशारद लोकांचें असें मत पडलें कीं अशा प्रकारचा जाहीरनामा लावण्यास पोलिस कमिशनरास अधिकार नाहीं. तेव्हां या गोष्टीचा निकाल लावण्याचा मंडळींनीं बेत केला. जाहीरनामा लागला असतांही असंख्य जन जमा होऊं लागले व पोलिसांनींही दांडगाईचा प्रसंग येणार असें पक्कें जाणून कडेकोट तयारी केली. ज्या लोकांनीं प्रजाजनांस फूस दिली होती त्यांपैकीं ब्राडला साहेब अग्रगण्य होते. ते समक्ष या स्थलीं हजर होते. पोलिसांनीं लोकांस पकडण्याची सुरुवात केली. एका ठिकाणीं पांच पोलिसचे शिपाई एका मनुष्याभोंवतीं जमून त्यांस प्रहार करीत होते तिकडे ब्राडलासाहेबांची दृष्टि गेली. विजेच्या वेगानें ते त्या मनुष्याजवळ धांवत गेले. एका शिपायाच्या हातांतील दंड हिसकावून घेतला व मोठ्या गंभीर स्वरानें निक्षून बोलले कीं आतां जो कोणी या मनुष्यावर हात टाकील त्यास मी चीत करून सोडीन. तेव्हां प्रहार करणें सोडून निमूटपणीं त्यांनीं त्या मनुष्यास चौकीवर नेला इकडे दुसरा एक पोलीस शिपाई ब्राडलासाहेबांजवळ आला. चौकीकडे चलण्याविषयीं हुकूम करून आपल्या दंडुक्यानें त्यास ढोसूं लागला. साहेबांनीं शांतपणें असें न करण्याविषयीं सांगितलें व आपल्या अंगांत जास्त शक्ति आहे असें बोलून दाखविलें; परंतु अशी अवज्ञा त्या शिपायास सहन न होऊन त्यानें दुसऱ्या दोन शिपायांस खूण केली; परंतु त्या तिघांचाही ब्राडलासाहेबांनीं चांगला समाचार घेतला; तेव्हां सर्व पोलिस मंडळी अगदीं गप्प झाली, व लोकांस याचें मोठें नवल वाटलें. त्यांनीं आनंदाच्या भरांत ब्राडलासाहेबांस उचलून धरलें व खांद्यावर वाहून जाऊं लागले. कांहीं लोक टोप्या उडवून नाचूं लागले व कांहीं लोक शत्रूचा अभिभव व आपला जय प्रसिद्ध करण्याच्या हेतूनें आनंदप्रदर्शक असे उच्च स्वराचे उद्गार काढूं लागले. या दिवशींच्या सर्व

प्रकारावरून सरकारास फार भय वाटलें व त्यांनीं नमूद केलेला कायद्याचा मसुदा परत घेतला. पुढें या सर्व प्रकरणांत पोलिसांनीं केलेल्या जुलुमाच्या चौकशीसाठीं एक रायल कमिशन नेमलें गेलें, तेथें ब्राडलासाहेबांनीं फारच उत्तम प्रकारची व महत्वाच्या मुद्यावर जबानी दिली. त्याबद्दल साहेबांचे प्रसिद्धपणीं आभार मानले होते. याप्रमाणें लोकांच्या हक्काचें रक्षण केल्याबद्दल लोक त्यांचा कांहीं विशेष प्रकारांनीं सत्कार करूं इच्छित होते परंतु साहेबांनीं तें कबूल केलें नाहीं.

या प्रकरणामुळें एक मोठा लोकांचा फायदा झाला. हाईडपार्कसारखीं विश्रान्तिस्थलें केवळ सरकाराचींच आहेत का प्राकृत जनांस प्रसंगविशेषीं त्यांचा राजकीय प्रश्नांची चर्चा करण्यास उपयोग करण्याची मोकळीक आहे? या प्रश्नाचा लोकांच्या तर्फे निकाल झाला. या प्रसंगीं लोकांनीं माघार घेतली असती तर ही गोष्ट पुढें वारंवार नडली असती. गेल्या पंचवीस वर्षांत अशा प्रकारचे प्रसंग पुष्कळ झाले व यामुळें साधारण जनसमाजास आपले मनोभाव प्रगट करण्यास चांगली संधी मिळते. त्यापासून प्रजेचें हित तसेंच अधिकारापन्न लोकांचेंही हित आहे. या सर्व सुपरिणामांचें यश ब्राडला साहेबांचें आहे. नवल एवढेंच कीं २२ वर्षांच्या कोमल वयांत यांस हें कृत्य सुचलें कसें व तें शांतपणें पार पाडण्यास त्यांस धैर्य व धिमेपणा आला कसा? अथवा हें योग्यच आहे; कारण कीं

न निश्चितार्थाद्विरमंति धीराः ।

राजर्स वकिलाकडे तीन वर्षें राहून ब्राडलासाहेब हार्व्हे नांवाच्या वकिलाकडे कांहीं दिवस होते व तेथून पुढें कांहीं स्वतंत्र धंदा करावयास लागले. याच वेळेस त्यांनीं " स्वतंत्र विचार " या मताविषयीं कांहीं लेख लिहिण्यास सुरुवात केली. शिवाय लंडन व बाहेरील प्रांत यांमध्यें व्याख्यानें देण्यास ते वारंवार जात. या त्यांच्या कृत्यांत त्यांचे जितके हाल झाले तितके थोडयाच लोकांचे झाले असतील. पूर्वी बाहेरगांवच्या लोकांस कधीं व्याख्यान ऐकावेंसें वाटलें तर लंडनाहून मुद्दाम मनुष्य नेणें त्यांच्या जिवावर येई. कारण कीं, त्याचा जाण्यायेण्याच्या व इतर खर्चासाठीं मंडळी चुरून जात असे; परंतु ब्राडलासाहेबांनीं ही चाल

मोडून टाकिली. व्याख्यान देण्यासाठीं जागा व जाहिराती एवढ्यांची तजवीज केली ह्मणजे हे व्याख्यान देण्यास तयार असत. यासंबंधानें कांहीं कांहीं त्यांच्यावर मोठे विलक्षण प्रसंग आले होते. एकदा एडिनबर्ग मुक्कामीं व्याख्यान दिल्यावर तेथील त्यांचा सर्व खर्च भागून त्यांजवळ थोडे पैसे उरले होते. तेथून त्यांस बोल्टन मुक्कामीं व्याख्यान द्यावयास जावयाचें होतें. पहांटेस पांच वाजतां उठले तों आश्रमांत कोणी जागें नव्हतें तेव्हां कांहीं खाल्ल्याप्याल्याशिवाय स्टेशनावर गेले. गाडी करण्यास किंवा मजूर करण्यास पैसे नव्हते, ह्मणून साहेबांनीं आपलें सर्व सामान आपणच नेलें. स्टेशनावर येतात तों ज्या गाडीनें जाण्यापुरते यांजवळ पैसे होते ती गाडी कांहीं हरकतीमुळें वेळेवर आली नाहीं, इतक्यांत दुसरी एक जलद जाणारी गाडी मिळाली परंतु हिचें हांशील जास्त होतें तेव्हां ज्या ठिकाणीं जावयाचें होतें त्याच्या अलीकडील स्टेशनाच्या टिकिटापुरतेच पैसे निघाले व खाण्यापिण्यासाठींही दोनचार आण्यांवर जास्त शिलक राहिले नाहींत. तेव्हां या पैशांत कसा तरी निर्वाह करून स्टेशनावर पोहोंचले व टिकिटाच्या भरतीच्या पैशाबद्दल आपली एक पिशवी स्टेशनमास्तराच्या जवळ गहाण ठेविली. बोल्टन शहरीं मोठ्या शर्थीनें पावणेआठ वाजतां पोहोंचले व आठ वाजतां व्याख्यान सुरू व्हावयाचें होतें ह्मणून मोठ्या लगबगीनें बिऱ्हाडीं जाऊन कपडे बदलून व्याख्यानपीठावर भुकेनें व्याकूळ व थंडीनें काकडलेले असे दाखल झाले. व्याख्यानाची जागा संकुचित होती व प्रकाशही उज्वल नव्हता त्यामुळें सर्वच त्रास येण्यासारखा प्रकार होता. असे त्यांचे हाल होत असतांही एका प्रतिपक्षाकडील मनुष्यानें त्यांस असा दोष दिला कीं व्याख्यानावर विपुल द्रव्य मिळवून तुह्मी चैन करितां, त्याचें ब्राडलासाहेबांस फार नवल वाटलें.

याच सुमारास लॉंकाशायर प्रांतांत व्यापारविषयक व धर्मविषयक व्याख्यानें देऊन त्यांनीं बरीच कीर्ति मिळविली. म्यान्चेस्टर व राकडेल व आजूबाजूच्या गांवांत त्यांस कधींच प्रत्यवाय झाला नाहीं; परंतु कोळशाच्या खाणींच्या प्रांतांतील लोकांनीं मात्र यांच्याशीं फार निंद्य व गर्हणीय अशा प्रकारचा व्यवहार केला. वायगन गांवचे लोक धर्म-

विषयक व्याख्यानकारांची फार टर उडवितात अशी प्रसिद्धि होती म्हणून ब्राडलासाहेबांनीं या गडावर हल्ला करून हा सर करण्याचा निश्चय केला. प्रथम दोन व्याख्यानांची जाहिरात दिली. व्याख्यानांचा विषय " इंग्लंडांतील स्त्रीपुरुषांस बायबलापासून काय उपयोग झाला " असा होता. पहिल्या दिवशीं प्रतिपक्षाकडील सर्व योद्धे हजर होते परंतु व्याख्यान शांतपणें शेवटास गेलें. दुसऱ्या दिवशीं जो प्रसंग घडला तो रानटी देशांतील लोकांस देखील कालिमा आणण्यासारखा होता. लोकांची गर्दी फार जमली. ज्यांचा प्रवेश होईना त्यांनीं इमारतच मोडण्याचा उद्योग चालविला. सर्व खिडक्यांचीं तावदानें फोडून टाकिलीं. व्याख्यानकार उभे राहिल्याबरोबर सीत्कारांची रेलचेल उडविली. सर्व जागा भरून गेली म्हणून दारें लाविलीं तेव्हां बाहेरून लोक धक्के मारूं लागले. एक धर्मगुरु एका टोळीचा अग्रणी होऊन आंत प्रवेश मिळण्याविषयीं हुजत करूं लागला. दार उघडलें नाहीं तेव्हां दारावर सर्वांनीं मिळून हल्ला केला व द्वार उघडूं लागले. ब्राडला साहेबांनीं आपल्या अतुल बलानें सर्वांस मार्गे हटवून दार बंद केलें. इतक्यांत कांहीं मुलें फुटक्या तावदानामधून आंत शिरलीं. कांहीं लोक हवा येण्यासाठीं झरोके होते ते फोडून त्या भगदाडांतून शिरले. कांहीं लोक घरावर चढून चुना व पाणी आंत ओतूं लागले. एका मनुष्यानें घराच्या अग्रभागीं एक भोंक पाडलें व त्यामधून आपला हात भोसकून हातांत व्याख्यानाच्या जाहिरातीची एक प्रत फडकवूं लागला. इतक्यांत दिवाणखान्यांतील एका माणसाची तिकडे नजर गेली तेव्हां तो थाबरून म्हणाला हें पहा भूत आलें आहे. हें ऐकून सर्व मंडळी गोंधळून गेली. धार्मिक लोक होते ते व्याख्यानकारास शिव्या देऊं लागले. कोणी त्याच्या तोंडावर थुंकलें. कोणी त्याच्या पाठीमागें जाऊन लपून त्यास मारूं लागले. याप्रमाणें सभेचे विसर्जन झाल्यावर साहेब जेव्हां बाहेर आले तेव्हां सर्व लोक कर्कशआवाजानें त्यांच्यावर तोंड सोडूं लागले. अशा प्रसंगीं हे लोक आपला जीव घेण्यास ही मार्गे पुढें पहाणार नाहींत असें वाटून आश्रमांत परत न जातां परस्पर आगगाडीवर जाण्याचा त्यांनीं निश्चय केला; परंतु स्टेशनावर गेल्यावर त्यांस स्मरण झालें कीं पैसे आश्रमांत गांठोड्यांत राहिले;

तेव्हां निरुपाय होऊन ते आश्रमांत सुखरूप परत आले. तेथील यजमानीण बाईस जेव्हां हे परत आल्याची बातमी समजली तेव्हां तिनें एकदम आश्रम सोडून जाण्याविषयीं निक्षून सांगितलें. तिला अशी भिती वाटली कीं हे गृहस्थ तिच्या आश्रमांत राहिले तर लोक आश्रमावर हल्ला करून इमारत पाडून टाकितील. रात्रीचा समय तेव्हां अशा वेळेस कायद्याप्रमाणें आश्रमांतून घालविण्याचा बाईस हक्क नाहीं हें साहेबांनीं जाणून प्रत्युत्तर केलें नाहीं व स्वस्थ चित्तानें माडीवर जाऊन निजले. त्या गांवच्या अधिकाऱ्यांनींही पूर्वी त्यांस अशी दहशत घातली होती कीं जबरदस्तीनें व्याख्यान बंद करण्याचा यत्न करूं. तेव्हां साहेबांनीं त्यांस निर्भीडपणें असें उत्तर केलें होतें कीं, " यत्न करून पहा म्हणजे समजेल. " असो. याप्रमाणें हकीकत झाली असतांही साहेबांनीं याच गांवीं वारंवार येऊन व्याख्यानें देण्याचा निश्चय केला व त्यांच्या निश्चयाचें फलही त्यांस मिळालें. त्याच बायगन गांवीं ते इतके लोकप्रिय झाले कीं तेथें कित्येक लोकांनीं त्यांच्या मताचा समाज स्थापिला. याचें नांव दीर्घउद्योग !! याचें नांव सतत प्रयत्न! निश्चयाचें बळ असल्यावर फळ प्राप्त झाल्याशिवाय रहात नाहीं.

विघ्नैः पुनःपुनरपि प्रतिहन्यमानाः
प्रारब्धमुत्तमगुणा न परित्यजन्ति ।

असाच प्रसंग गर्नसीबेटांत आला होता. तेथें यांच्या एका मतानुयायी गृहस्थानें विशिष्टमतविषयक अशीं पुस्तकें वांटलीं. याबद्दल त्यास वीस पाउंड दंड केला होता. त्याचा पक्ष घेण्याकरितां ब्राडलासाहेब मुद्दाम आले. यांनीं तेथील अधिकाऱ्यांस त्यांच्या अन्याय्यकृत्याबद्दल प्रसिद्धपणें पत्रें लिहिलीं व गांवांत व्याख्यानें देण्याचा बेत केला. या ठिकाणीं जाहिराती छापण्याचें काम कोणी पतकरणार नाहीं असें त्यांस पूर्वीच वाटलें होतें म्हणून त्यांनी बरोबर जाहिराती आणल्या होत्या परंतु त्या जागजागीं लावण्यास मनुष्य मिळेना तेव्हां स्वारीनें स्वतः हातांत शिडी, खळीचा डबा व कुंचली घेऊन तें काम केलें. व्याख्यानाच्या वेळेस लोक मस्ती करूं लागले. प्रथम व्याख्यानगृहांत कोणीच येईना व दारावर पैसे जमा करण्यास माणूस मिळेना तेव्हां लोकांस

फुकट घेण्याची सुरुवात केली, व लोकांची गर्दी जमली. व्याख्यान सुरू झालें व कांहीं वेळ सुरळीतपणें चाललें; परंतु पुढें बाहेर फारच गोंगाट होऊं लागला तेव्हां श्रोतृजनास स्वस्थ बसण्यास सांगून साहेब बाहेर जाऊं लागले. कित्येकांस त्यांच्या जिवास धक्का पोंचेल असें वाटल्यावरून त्यांनीं त्यांचा निषेध केला; परंतु ब्राडलासाहेबांनीं त्यांचें ऐकिलें नाहीं. बाहेर आल्याबरोबर लोक त्यांस दगड मारूं लागले. कित्येक लोकांच्या मनांत तर त्यांच्या नरडीचा घोट घ्यावा असें होतें परंतु त्यांची ती धीरश्री पाहून मंडळी घाबरली व त्यांचे विचार मनांतल्या मनांत राहिले. तेव्हां फिरून आंत जाऊन त्यांचें व्याख्यान निर्वधपणें शेवटास गेलें. दुसऱ्या एक दोन प्रसंगीं याच स्थळीं लोकांनीं असेंच असभ्य वर्तन केलें व त्यांस समुद्रांत फेंकून देण्याचें भय घातलें परंतु केवळ वल्गनांच्या पलीकडे त्यांच्या हातून कांहीं झालें नाहीं.

यानंतर ब्राडलासाहेबांची स्वारी पश्चिम प्रांतांकडे वळली. डेव्हनपोर्ट मुक्कामीं एका सार्वजनिक उद्यानांत यांचा भाषणसमारंभ झाला. भाषण सुरू झाल्याबरोबर पोलिसच्या अधिकाऱ्यानें मनाई केली तेव्हां व्याख्यान बंद झालें. दुसऱ्या दिवशीं शेजारचें एक शेत भाड्यानें घेऊन तेथें व्याख्यानसमारंभ करण्याचें ठरविलें. तेथेंही व्याख्यान सुरू झाल्याबरोबर पोलिसच्या अधिकाऱ्यानें त्यांस पकडलें व शेताबाहेर आल्याबरोबर सोडून दिलें; तेव्हां ते फिरून शेतांत जाऊन व्याख्यान देऊं लागले. तेव्हां फिरून त्यांस पकडून तुरुंगांत टाकिलें व जामिनावर सोडीनात. पुढें माजिस्ट्रेटापुढें खटला चालला. कसेंही करून शिक्षा ठोकण्याचा माजिस्ट्रेटाचा कल होता. परंतु ब्राडलासाहेबांनीं आपलें कायद्याचें ज्ञान उत्तम प्रकारें दाखवून आपली सुटका करून घेतली. या खटल्यामुळें त्यांची फार वाहावा झाली व पुष्कळ लोकांनीं त्यांचा पक्ष स्वीकारला. नंतर यांनीं एक फारच चमत्कारिक युक्ति लढविली. गांवाजवळ एक नदी होती त्या नदीच्या प्रवाहावर गांवांतील अधिकाऱ्यांचा अंमल नव्हता. या गोष्टीची पक्की चौकशी करून साहेबांनीं व्याख्यानाची जाहिरात प्रसिद्ध केली. लोकांची गर्दी फार जमली. पोलिसचे अधिकारी हरकत करण्यास सज्ज झाले. लष्करी लोकांची टोळीही तयार

ठेविली. आतां काय मौज होते हें पहाण्यास लोक फार उत्सुक झाले. पाऊस धो धो पडत होता तरी लोक जमतच होते. इतक्यांत ब्राडलासाहेब नदीकडे वळले व एका होडींत बसून एक गलबत जवळच होतें तिकडे गेले. लोकांस या कृत्याचा कांहींच उमज पडेना. गलबत किनाऱ्यापासून सुमारें तीन यार्ड होतें. तेथें पोहोंचल्यावर व्याख्यानास सुरुवात केली. श्रोतृसमाजास व्याख्यान स्पष्टपणें ऐकूं येत होतें परंतु पोलिसाच्यानें व्याख्यान बंद करवेना. कारण कीं पाण्यामध्यें त्यांची हद्द नव्हती. तेव्हां त्यांचा फार हिरमोड झाला, व लोकांनींही त्यांची फार छी थू केली व ब्राडलासाहेबांची वाहवा केली.

वरील मासल्याचींच आणखी एकदोन उदाहरणें देऊन नंतर दुसऱ्या गोष्टींकडे वळूं. एकदां स्काटलंड देशांत डंफ्रिज मुक्कामीं व्याख्यान देण्यासाठीं ब्राडला साहेब गेले. जागेची वगैरे सर्व तजवीज यथास्थित लागली ; व सूज्ञ असा श्रोतृसमाज जमेल असा अजमास होता. संध्याकाळ झाल्याबरोबर कामधंद्याचे तसेच रिकामटेकडे लोक रस्त्यांत जमा झाले, व संकेताप्रमाणें घंटा वाजल्याबरोबर सर्वजण साहेबांच्या पाठीमागून व्याख्यानगृहाकडे चालले. प्राचीन धर्ममताभिमानी लोकांनीं कांहीं हस्तपत्रकें काढिलीं होतीं, तीं वांटण्याचा सपाटा सुरू होता. हा सर्व जनसंमर्द गृहाच्या दाराशीं लोटला व साहेबांस प्रवेश मिळेना. शेवटीं मारामारी करून साहेब आंत शिरले ; परंतु दुराग्रही लोकांच्या अविरत आक्रोशामुळें व्याख्यान सुरू करतां येईना. भाषणास आरंभ केल्याबरोबर आक्रोश गुरुतर होई. गृहाच्या बाजूनें खिडक्या वगैरे नव्हत्या तेव्हां मोठ्या दरवाजानेंच आंत धोंडे फेंकण्याचा प्रकार सुरू झाला. परंतु मंडळी मद्यपानानें तर्र झाली असल्यामुळें त्यांचा नेम फारसा साधत नसे ह्मणूनच दिव्यांचा बचाव झाला. पोलिसाच्या लोकांस अनुकूल करून घेतले होते तेव्हां अशा स्थितीचा प्रतीकार होण्याचा मार्ग राहिला नव्हता. असा प्रकार मध्यरात्रीपर्यंत चालला तेव्हां साहेबांस व्याख्यानाचा नाद सोडून बिऱ्हाडीं जावें असें वाटलें. त्यांच्या पक्षाची जी मंडळी बाहेर पडली त्यांची लत्ताप्रहारांनीं चांगली संभावना झाली व खुद्द साहेब बाहेर आले ह्मणजे प्राणहरणाचा प्रयोग त्यांच्यावर करण्याच्या तयारींत मंडळी

होती. अखेरीस एका गृहस्थास त्यांची दया येऊन त्यानें एका भुयारांतून त्यांस सुखरूप बाहेर नेलें. बाहेर पडल्यावर मोठ्या रस्त्यानें गेलें असतां दीपप्रकाशाच्या योगानें लोक आपल्यास ओळखतील अशा धास्तीनें त्यांनीं नदीतीराचा मार्ग स्वीकारला; व संतप्त चित्तास आनन्द देणाऱ्या अशा मृदुपवनाचा उपभोग घेत व जलतरंगाचे मंजुल स्वर ऐकत निशीथसमय अतिक्रांत झाला असतांही जनसंमर्द मोडण्याची वाट पाहत बसले, व कांहीं कालानें आश्रमांत जाऊन त्यांनीं विश्रांति घेतली. ज्या शहरांत असा असभ्य व शिष्टसंप्रदायास विरुद्ध प्रकार घडला त्याच ठिकाणीं हल्लीं 'स्वतंत्र विचार' मताचा फार प्रसार झालेला आहे व आधुनिक विचारांस पूर्ण आश्रय मिळत आहे.

बर्नले मुक्कामीं कांहीं निराळाच प्रकार झाला. भाषण सुरू झाल्यावर प्रतिपक्षाकडील एक गृहस्थ वादविवादासाठीं उभा राहिला. परंतु नेहमीच्या चालीप्रमाणें दहा मिनिटांत आपलें बोलणें आटपीना व दुसऱ्या कोणास बोलूं देईना. अध्यक्षाच्या विनंतीस मान देईना. सेक्युलरिस्ट पक्षाच्या लोकांची निर्भर्त्सना करूं लागला व सर्व व्यवहार मनसोक्त करण्याविषयीं हट्टास पेटला. त्यास गप्प करण्याची दुसऱ्या कोणाची छाती होईना, तेव्हां ब्राडलासाहेबांनीं त्याच्या बाह्यास धरून जबरीनें त्यास खालीं बसविलें. असें झाल्याबरोबर तत्पक्षीय लोक व्याख्यानपीठावर चढून मारहाण करूं लागले. दोन्ही पक्षांच्या लोकांमध्यें लढाई सुरू झाली. ब्राडला वगैरे मंडळीस खालीं पाडून त्यांस लत्ताप्रहार केले. परंतु शेवटीं त्यांच्या पक्षाचाच जय झाला. तेव्हांपासून प्रतिपक्षाची चांगली खोड मोडली व फिरून प्रत्यवाय करण्याचें कोणीं मनांत आणलें नाहीं.

हडर्सफील्ड मुक्कामीं तिसराच प्रकार झाला. ज्या गृहांत व्याख्यान व्हावयाचें होतें त्या गृहाच्या मालकास दहशत घालून त्याच्याकडून तें गृह बंद ठेवविलें व दारावर पोलिसाचा पहारा ठेविला. साहेब व त्यांचे अनुयायी दाराशीं जातात तों दार बंद. अनुयायिसमाज मोठाच जमला होता. दूरदूरच्या गांवाहून व्याख्यानाकरितां लोक आले होते. इतक्या समाजाची निराशा होणें श्रेयस्कर नाहीं असें जाणून साहेबांनीं दार जबरीनें

उघडलें. असें झाल्याबरोबर पोलिस जवळच होते त्यांनीं साहेबांस कैद केलें. माजिस्ट्रेटासमोर हजर रहाण्याचें कबूल केल्यावर त्यांची सुटका झाली. माजिस्ट्रेटासमोर खटल्याचा निकाल साहेबांच्या तर्फें झाला.

असे अनेकविध प्रसंग आले असतांही यांनीं धैर्य न सोडतां अंगीकृत व्रताचें आत्मनिरपेक्ष परिपालन केलें यापेक्षां त्यांच्या महत्वाची दुसरी काय साक्ष पाहिजे.

१८५५ सालीं ब्राडला साहेबांनीं आपल्या पंथाच्या प्रसारासाठीं विशेष परिश्रम सुरू केले हें वर सांगितलेंच आहे. धर्मविषयक पुस्तकें लिहिणें व व्याख्यानें देणें यांवर त्यांनीं झोड उडविली. रविवारीं तीन व्याख्याने देणें म्हणजे एक साधारणच गोष्ट होऊन गेली होती. १८५८ सालीं त्यांनीं फारच परिश्रम केले. या वर्षीं लंडन सेक्युलर सोसाइटीचे ते अध्यक्ष झाले. रेव्हरंड ब्रुइन नांवाच्या गृहस्थाबरोबर त्यांनीं धर्मविषयक वादविवाद केला वं त्यापासून त्यांच्या पंथास बरीच पुष्टि मिळाली. त्याच वर्षीं ' इन्व्हेस्टिगेटर ' नांवाचें वर्तमानपत्रही ते चालवूं लागले. परंतु हें पत्र फार दिवस टिकलें नाहीं. वर्गणीदार फार न मिळाल्याकारणानें याचा खर्च भागेना म्हणून १८५९ सालीं तें बंद करावें लागलें. या वर्षींही आपल्या मताच्या समर्थनार्थ त्यांनीं पुष्कळ विद्वान् लोकांशीं भवति न भवति केली. शेफील्ड मुक्कामीं एका गृहस्थाशीं वादविवाद झाला तेव्हां ब्राडला साहेबांचें अज्ञान व्यक्त करण्याकरितां त्यानें हिब्रुभाषेंत वाद चालविला; परंतु साहेबमहशुफांनीं त्याही भाषेंत आपली गति निदर्शनास आणिली व शत्रूचा पाडाव केला. १८६० सालीं आगगाडीला कांहीं अपघात झाला त्या वेळेस त्यांच्या जिवावरचा एक मोठा प्रसंग टळला. त्याच वेळेस हल्लीं सुप्रसिद्ध असलेलें "न्याशनल रिफार्मर" नांवाचें पत्र, ज्याचें आधिपत्य पुष्कळ वर्षांपासून त्यांजकडे आहे, सुरु करण्याची वाटाघाट झाली. तेव्हां ब्राडला साहेब व त्यांच्याच मताचे दुसरे एक अग्रणी जोसेफ बार्कर या दोघांस सहाधिकारित्व देण्यांत आलें. परंतु ही व्यवस्था श्रेयस्कर झाली नाहीं. दोघांनीं निम्में पत्र वांटून घेतलें व परस्परविरोधि असे लेख पत्रांत येऊं लागले. येथवरच मजल थांबली नाहीं. गालिप्रदानासही सुरुवात झाली. तेव्हां

ही व्यवस्था अजीबात बंद झाली व सर्व पत्र ब्राडला साहेबांच्या हातांत आलें. १८६०-६१च्या सुमारास इटली देशांत गॅरिबाल्डीनें देशाचें स्वातंत्र्य मिळविण्यासाठीं जो प्रचंड व्यूह रचिला होता त्याच्या साह्यार्थ ब्राडला साहेबांनीं ठिकठिकाणीं व्याख्यानें देऊन वर्गणी जमा केली होती, त्याबद्दल गॅरिबाल्डीनें त्यांचे आभार मानिले होते. या नंतर अनेकदां ते इटली देशांत राजकीय उलाढालीकरितां गेले होते. एका समयीं नेपल्स मुक्कामीं असतां त्यांकडे कांहीं महत्वाचे कागदपत्र आले होते. ही बातमी अधिकाऱ्यांस कळतांच त्यांनीं कागदपत्र जप्त करण्याचा यत्न चालविला. नेपल्स सोडून जहाजांत बसून दुसऱ्या एका मुक्कामीं ते गेले तेव्हां पोपमहाराजांची कांहीं मंडळी जहाजावर आली व यांनीं ब्राडला साहेबांचा शोध करून त्यांस असें कळविलें कीं ब्रिटिश कौन्सलास आपल्यास भेटण्याची इच्छा आहे. परंतु कांहीं तरी दगा आहे हें साहेबांनीं ताडलें व उतरण्याचें नाकारलें. उतरले असते तर रोमन कायद्यांची त्यांजवर अम्मलबजावणी झाली असती. युक्ति फसली असें पाहून त्या लोकांनीं त्यांच्या पेटीचा झाडा घेण्याचें मनांत आणिलें परंतु साहेबांनीं आपलें पिस्तुल हातीं घेतलें व सज्ज करून आपण पेटीवरच बसले. इतक्यांत जहाजावरचे एक अमेरिकन गृहस्थ त्यांच्या मदतीस आले तेव्हां ते लोक परतले.

१८५९ सालाच्या आरंभीं फ्रेंच सरकारच्या सूचनेवरून डाक्टर सायमन बर्नार्ड यांजवर राजद्रोहानिमित्त एक खटला सुरू झाला होता, त्या खटल्यांत ब्राडला साहेबांनीं आरोपिताचा पक्ष स्वीकारून त्यास योग्य मदत करण्यासाठीं फार परिश्रम घेतले. या त्यांच्या वर्तनामुळें फ्रेंच सरकारच्या डोळ्यांत हे फार खुपूं लागले. यांच्या पाठीमागें फ्रेंच हेर नेहमीं असत. एके दिवशीं एका आश्रमांत हे बसले असतां तेथें या वर्गांतील एक गृहस्थ गेला व झोंपेचें सोंग घेऊन एका मेजावर पडला. ब्राडला साहेबांनीं त्यास ओळखिलें व एक कागदाचा तुकडा पेटवून त्यांनीं त्याच्या नाकाशीं धरिला; तेव्हां तो धडपडत उठून कांहीं एक भाषण न करितां आश्रमांतून निघून गेला. या खटल्यांतील आरोपी अखेरीस दोषमुक्त झाला.

न्यायपरिषदांसमोर येणाऱ्या लोकांनीं शपथपूर्वकच जबानी दिली पाहिजे या विषयाबद्दल वाटाघाट प्रसंगविशेषीं करण्यांत येत असे; परंतु याबद्दल कांहीं तरी निश्चय व्हावा अशाबद्दल ब्राडला साहेबांनीं फार खटपट केली. १८६० सालीं एका नास्तिक बाईनें कांहीं कारणा वरून फिर्याद केली होती त्यावेळेस तिचा ईश्वरावर भरंवसा नाहीं येवढ्याच मुद्यावरून तिची तक्रार न्यायाधिकाऱ्यांनीं चालू दिली नाहीं. याचप्रमाणें याच मुद्यावरून ब्राडला साहेबांच्याही विरुद्ध एका खटल्यांत निकाल झाला; तेव्हां साहेबांनीं या विषयासंबंधीं बरीच भवति न भवति चालविली; परंतु त्यांस तेव्हां यश आलें नाहीं. तथापि त्यांनीं या विषयाचा पिच्छा सोडला नाहीं; व पुढें कांहीं वर्षांनीं यासंबंधीं एक स्पष्ट कायदा करण्यांत आला त्यामुळें सर्व प्रकारची गैरसोय दूर झाली.

१८६३ च्या अखेरीस ब्राडला साहेबांची प्रकृति नीट नसल्यामुळें त्यांस "न्याशनल रिफार्मर" पत्राचें आधिपत्य कांहीं दिवसपर्यंत सोडावें लागलें. याच सुमारास अमेरिकेंतील लढाई सुरू झाली. त्या प्रसंगीं व्याख्यानें वगैरे देऊन त्यांनीं फार मदत केली; व लढाईमुळें लांकाशायर प्रांतांतील कापसाच्या गिरण्यांतील लोकांस जें दैन्य प्राप्त झालें त्याच्या परिहारार्थ कांहीं व्याख्यानांचें उत्पन्न त्यांनीं दिलें. १८६६ सालीं ट्राफलगारस्क्वेअर व हाईडपार्क या ठिकाणीं बहुजनसमाजांत त्यांनीं व्याख्यानें दिलीं. त्या दोन्ही स्थळीं पोलिसाकडून बरीच हरकत झाली, तथापि मोठ्या नेटानें यांनीं काम चालविलें व अशा ठिकाणीं जमण्याचा आपला हक्क कायम केला. याच सुमारास आयर्लंडांत प्रजासत्तात्मक राज्य स्थापन करण्याबद्दल खटपट सुरू झाली होती. या प्रकरणांत जे अग्रेसर होते त्यांनीं एक जाहीरनाम्याचा मसुदा ब्राडला साहेबांस दाखविला, व त्यांनीं त्यांत कांहीं फेरफार सुचविले; परंतु हें सर्व प्रकरण यांनींच उपस्थित केलें अशाबद्दलचा सरकारास वहीम येऊन त्यांनीं त्यांजवर अप्रत्यक्ष रीतीनें पहारा ठेविला, परंतु त्यापासून कांहीं निष्पन्न झालें नाहीं. अशा स्थितींत हे साहेब बिलकुल डगमगले नाहींत. तद्विषयक लेख लिहिण्याचा व व्याख्यानें देण्याचा

क्रम त्यांनीं जारी ठेविला. एका लेखासंबंधानें ग्लॅडस्टन साहेबांकडून अभिनन्दनप्रदर्शक अशी एक पत्रिका यांस आली होती.

या व दुसऱ्या कांहीं प्रकरणांमुळें सरकारचा जो रोष यांजवर झाला त्याचें निदर्शन लवकरच मिळालें. "न्याशनल रिफार्मर" हें पत्र निघाल्यास आठ वर्षांवर होऊन गेलीं होतीं. इतक्या वर्षांत हें पत्र प्रसिद्ध होण्याबद्दल व त्यांत येणाऱ्या मजकुराबद्दल कोणत्याच प्रकारची शर्त ठेविली नव्हती. परंतु या वर्षीं एका जुन्या कायद्याच्या अन्वयें सरकाराकडून ब्राडला साहेबांस अशी ताकीद देण्यांत आली कीं सदरहू पत्रांत निन्दाविषयक किंवा प्रजासंक्षोभजनक असे लेख न येण्याविषयीं चार हजारांचा जामीन दिला पाहिजे. परंतु ही गोष्ट आपणास कबूल नाहीं व अखेरपर्यंत हिची शहानिशा करण्यास आपण कबूल आहों असा साहेबांनीं जबाब दिला. त्यांचें धैर्य कसोटीला लावण्यासारखाच दुर्धर प्रसंग हा होता. सरकारचा खजिना मामूर पण ब्राडलासाहेबांच्या पोतडींत अर्थाचा पूर्ण अभाव. सरकारास न्यायनिपुण व वाक्पटु अशा नैय्यायिकांची मदत पण ब्राडलासाहिब मुद्राराक्षसांतील "बुद्धिस्तु-मागान्मम" या चाणक्याच्या भाषणाप्रमाणें केवळ आपल्या बुद्धिविभवावर हवाला देऊन दंड थोपटून उभे राहिलेले. अशा स्थितींत खटला उपस्थित होऊन बरेच दिवस लांबला. ब्राडला साहेबांनीं आपलें कायद्याचें ज्ञान किती कुशाग्र आहे हें वारंवार दाखविलें. स्नेही मंडळींनेंही त्यांस भिन्न भिन्न उपायांनीं मदत केली. कांहींनीं वर्गणी करून पैसे जमा केले; कांहींनीं लेख लिहून जनतेचें मत त्यांना अनुकूल करण्याचा यत्न केला; कांहींनीं पार्लमेंटांत याबद्दल चर्चा सुरू केली. अखेरीस सरकारचा पराभव व ब्राडला साहेबांचा जय झाला व ज्या कायद्याच्या अन्वयें हा खटला उपस्थित झाला तो कायदाही मागाहून रद्द करण्यांत आला. या एकंदर प्रकरणाच्या योगानें वर्तमानपत्रांची स्वतंत्रता पूर्णपणें अनियंत्रित झाली, व या गोष्टीमुळें ब्राडला साहेब विशेष लोकप्रिय झाले. या दीर्घ प्रयत्नाबद्दल जॉन स्टुअर्ट मिल यांनीं ब्राडला साहेबांची फारच तारीफ केली. हा खटला सुरू असतांच या साहेबांनीं नार्थाम्प्टन शहराच्या तर्फें पार्लमेंटांत आपली निवडणुक होण्याबद्दल खटपट सुरू केली. परंतु या प्रसंगीं त्यांस यश आलें नाहीं. परंतु निवडणुकीच्या

वेळेस जो सर्व प्रकार झाला त्याच्या योगानें त्यांस पुढें उद्योग सुरू ठेवण्यास उमेद आली.

वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें जरी सर्व बाबतींत ब्राडला साहेबांस यश आलें तथापि त्यांजवर ऋणाचें ओझें जबरदस्त पडलें. या भारापासून निर्मुक्त होण्याच्या इराद्यानें त्यांनीं आपल्या खर्चांत काटकसर करण्याचा निश्चय केला. या समयीं त्यांचें वार्षिक उत्पन्न दहा हजार रुपयांचें होतें. तेव्हां खर्चांत काटकसर करून कर्ज फेडून टाकावें असें त्यांच्या मनांत येऊन त्यांनीं गरीबीच्या रीतीनें रहाण्याची सुरुवात केली; तथापि त्यांचें स्वाभाविक औदार्य कायम होतें. एक वेळ एका धर्मगुरूनें यांच्या बायकामुलांसंबंधानें कांहीं नालस्तीचा मजकूर प्रसिद्ध केला होता. तेव्हां ब्राडलासाहेबांनीं त्यावर फिर्याद केली व लिहिलेला लेख परत घ्यावयास लाविलें. शिवाय नुकसानीबद्दल त्यांस एक हजार रुपये मिळाले होते. या रकमेंतून खर्च वजा करून बाकीचे पैसे साहेबांनीं धर्मार्थ खर्च केले.

अशा गरीब स्थितींत रहात असतां १८७० सालाच्या सप्टेंबर महिन्यांत एक फ्रेंच बाई ब्राडला साहेबांच्या भेटीस आली. या बाईचा व साहेबांचा पूर्वीचा परिचय नव्हता. परंतु ब्राडला साहेबांची जनहिताविषयींची आस्था विश्रुत होतीच, तेव्हां अशा पुरुषाच्या साहाय्यानें तेव्हां चालू असलेल्या लढाईमुळें दुःस्थितीप्रत पोंचलेल्या फ्रेंच लोकांचा उद्धार होईल असें तिला वाटल्यावरून ती यांच्या भेटीस आली होती. तिच्या भाषणानें साहेबांस फारच स्फूर्ति उत्पन्न झाली व नानास्थलीं सभा भरवून त्या विषयाचा ऊहापोह करण्यास त्यांनीं प्रारंभ केला. या सर्व उद्योगाचा अपेक्षित परिणाम झाला. खुद्द ग्लाड्स्टन साहेब वर निर्दिष्ट केलेल्या बाईची भेट घेण्यास गेले. नंतर फ्रान्स देशांतून कांहीं राजकारणी पुरुष येऊन त्यांजबरोबर कांहीं बोलणेंही झालें; परंतु या गृहस्थाच्या चुकीमुळें व्हावा तसा फायदा झाला नाहीं. ब्राडला साहेबांनीं केलेल्या परिश्रमाबद्दल फ्रेंच सरकारानें त्यांचे आभार मानिले होते. १८७१ सालीं फ्रान्समध्यें जे दोनपक्ष झाले होते त्यांमध्यें मध्यस्थी करण्याकरितां ब्राडला साहेब फ्रान्सदेशांत गेले होते; परंतु कॉले मुक्का-

मींच त्यांस प्रतिबंध करण्यांत आला होता, व वरिष्ट अधिकाऱ्यांकडून हुकूम आल्यावर त्यांची सुटका झाली. परंतु त्यांस परत यावें लागलें. फिरून कांहीं महिन्यांनीं ब्राडला साहेब पारिस मुक्कामीं जाण्याकरितां निघाले होते परंतु त्यांस फिरून केवळ गैरसमजामुळें प्रतिबंध करण्यांत आला होता व दोन दिवस त्यांस कारागृहवास भोगावा लागला. सुटका झाल्यावर त्यांस पारिस शहरीं जातां आलें व नंतर केव्हांही त्यांस हरकत झाली नाहीं.

१८७१–७२ सालीं ब्राडला साहेबांनीं आपल्या पंथाचा प्रसार करण्यासाठीं फार उद्योग केला. प्रतिपक्षाकडील लोकांशीं वादविवाद करून, विविध लेख लिहून व नानास्थलीं निबंध वाचून व व्याख्यानें देऊन त्यांनीं आपल्या पक्षाचें चांगलें समर्थन केलें. राजकीय विषयांतही त्यांचा उद्योग सुरू होताच. ब्रन्सविक नांवाचें जें हल्लींचें राजघराणें आहे त्या घराण्याचा वंशपरंपरेचा गादीवर हक्क नसून तो हक्क केवळ लोकांच्या खुषीवर अवलंबून आहे असें यांनीं प्रतिपादन केलें. मोठमोठ्या व नामांकित ठिकाणीं त्यांनीं जाहिरव्याख्यानें दिलीं. शिवाय प्रिन्स आफ वेल्स हे दुखण्यांतून निभावल्यावर त्यांजविषयीं अभिनंदनप्रदर्शक असे जे लोकांनीं उद्गार काढिले ते वाजवीपेक्षां फाजील होते हें दाखविण्यासाठींही त्यांनीं सभा भरविल्या होत्या. या योगानें त्यांनीं जनपदपक्षपातित्व व राजवंशविरोध प्रकट केला. त्याचप्रमाणें प्रिन्स आर्थर यांस कांहीं जास्त नेमणूक करण्यांत आली होती तेव्हां कांहीं लोकांनीं विरुद्ध मत प्रदर्शित करण्यासाठीं हाईडपार्क येथें सभा भरविण्याचा बेत केला होता, परंतु सरकारतर्फे हरकत करण्यांत आली होती. ही गोष्ट ब्राडला साहेबांस कळतांच त्यांनीं स्वतःच्या सहीची एक जाहिरात प्रसिद्ध केली. तेव्हां सरकारांनीं त्यांस लेखी ताकीद दिली व सभा जबरीनें बंद करण्याची तयारी ठेविली. साहेबांनीं सरकारी अधिकाऱ्यांस लिहून पाठविलें कीं अशा प्रकारचा प्रतिबन्ध गैरकायदेशीर आहे, व प्रतिबन्ध केल्यास त्याचें निवारण करण्यांत येईल. असा बाणीचा प्रसंग पाहून सरकार घाबरलें व सभेच्या पूर्वी अर्धा तास प्रतिबंध न करण्याविषयीं त्यांनीं हुकूम सोडले. याचप्रमाणें दुसऱ्याही कांहीं प्रसंगीं यांनीं नेट धरून सरकारास मागें हटविलें.

फ्रांको-जर्मन लढाई आटपल्यानंतर प्रजासत्ताक राज्य स्थापन करण्याविषयीं इंग्लंड देशांत बरीच हालचाल सुरू झाली. सर चार्लस डिल्कसारख्या नामांकित गृहस्थांनीं तदनुकूल अभिप्राय प्रकट केल्यामुळें त्या चळवळीस विशेष पुष्टि मिळाली. नानाविध नवीन संस्था आविर्भूत झाल्या व लोकसत्तेचा ध्वज त्यांनीं उभारला. असेरीस १८७३ सालीं मे महिन्यांत बर्मिंगम मुक्कामीं एक परिषद् भरली. तिच्यामध्यें लंडन शहरांतील आठ समाजांकडून व प्रांतांतील चाळीस शहरांतून प्रतिनिधि आले होते. शिवाय ज्या समाजांस प्रतिनिधि पाठविण्याची सवड नव्हती त्यांनीं पत्रद्वारा आपली संमति प्रदर्शित केली होती. परिषदेचें काम चांगल्या रीतीनें तडीस गेलें. प्रजासत्ताक राज्याच्या मुख्य तत्वास अनुरूप असे ठराव पसंत होऊन एक मुख्य समाज स्थापण्यांत आला. या ठरावांत एक ठराव असा होता कीं प्रजासत्ताक राज्य स्थापन करण्यासाठीं स्पेन देशांत चालू असलेली खटपट या परिषदेस पूर्ण संमत आहे व ब्रिटिश सरकारांनीं या बाबतींत प्रदर्शित केलेली असंमति दूषणाई आहे. याच ठरावांत परिषदेच्या वतीनें स्पेन देशांत ब्राडला साहेबांस पाठविण्याचा निश्चय केला होता. ब्राडला साहेबांनीं हें काम मोठ्या हौशीनें पत्करिलें. माद्रिड मुक्कामीं जात असतां वाटेनें राजपक्षीय लोकांनीं त्यांचे बरेच हाल केले. परंतु धैर्याचें अवलंबन करून त्यांनीं तसाच मार्ग क्रमिला व सुखरूप उद्दिष्ट स्थानीं जाऊन पोंचल्याबरोबर तेथील प्रजापक्षीय धुरीणांची त्यांनीं गांठ घेतली. त्यांचें स्वागत फारच उत्तम रीतीनें करण्यांत आलें. त्यांस एक मेजवानी देण्यांत आली होती. मेजवानीच्या वेळीं जीं भाषणें झालीं त्यांत ब्राडला साहेबांची फार स्तुति झाली, व साहेबांचें प्रतिभाषण अभ्यागत जनांनीं मोठ्या उत्सुकतेनें व कौतुकानें ऐकिलें. मेजवानी तमाम झाल्यावर सर्व मंडळी साहेबांस त्यांच्या आश्रमापर्यंत पोंचवावयास आली. रथ्यांमध्यें असंख्य जनसमाज जमला, व मध्य रात्रीपासून तों प्रभातसमय होई तोंपर्यंत दर्शनोत्सुक व श्रवणोत्सुक असा जनसंमर्द आश्रमाभोंवतीं तटस्थ उभा होता. गायन व वादन यांच्या योगानें कांहीं मंडळी मनोरंजन करण्यांत व्यापृत होती. असेरीस फार आग्रह पडल्यावरून ब्राडला

साहेबांनीं आपल्या आश्रमातील सज्जावर येऊन लोकांस दर्शन दिलें व कांहीं शब्द बोलून त्यांचे कर्ण तृप्त केले. अरुणोदय झाल्यावर जनौघ विरळ होत चालला. त्या दिवशीं साहेबांनी सुमारें हजार लोकांशीं हस्तस्पर्श केला असेल. नानाविध सभांकडून त्यांस मानपत्रं देण्यांत आलीं व सर्व प्रसिद्ध लोकांच्या भेटी झाल्या. आल्या रस्त्यानें परत जाणें सुखावह होणार नाहीं असा तद्देशीय जनांचा अभिप्राय पडल्यावरून ब्राडला साहेब नौकेमधून परत गेले. या सर्व प्रवासासंबंधानें एक चमत्कारिक गोष्ट अशी आहे कीं एतत्संबंधी सर्व वृत्तांत आंग्ल वर्तमानपत्रांत सविस्तर न येतां न्यूयार्क हेरल्ड नांवाच्या वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झाला.

याप्रमाणें देशांतरीं व स्वदेशीं कीर्ति मिळाली. परंतु कर्जाची फेड करण्यापुरते पैसे जमा होईनात. व्याख्यानें देऊन व लेख लिहून त्यांस अर्थप्राप्ति बरीच होत असे; परंतु मुद्दल रकमेवरील व्याज जबर असल्या कारणानें लौकर ऋणमुक्त होण्याचा त्यांस संभव दिसेना. अमेरिकेंत यांचें नांव विश्रुत झालें होतें व पुष्कळ समाजांकडून यांस तेथें जाऊन व्याख्यानें देण्याविषयीं विनंति करण्यांत आली होती. द्रव्यप्राप्तीची ही संधि चांगली आहे असें जाणून साहेबांनीं अमेरिकेंत जाण्याचा निश्चय केला. जाण्यापूर्वी त्यांस एक मोठी मेजवानी देण्यांत आली. त्यासमयीं निरनिराळ्या प्रांतातून त्यांच्या मतानुयायिमंडळीच्या तर्फेनें प्रतिनिधि आले होते. त्यांजकडून साहेबांस मानपत्रें देण्यांत आलीं. त्या वेळच्या लोकांच्या उद्गारावरून आपल्यावर स्वपक्षीय लोकांचा किती लोभ व भरंवसा आहे याचा प्रत्यय साहेबांस आला.

१८७३ च्या सप्टेंबर महिन्यांत न्यूयार्क येथें जाण्याकरितां ब्राडला साहेब निघाले. तेथें पोचल्याबरोबर त्यांचें उत्तम प्रकारें स्वागत झालें. यांचें नांव ऐकिल्याबरोबर कस्टमच्या चौकीदारानें कांहीमात्र हरकत न घेतां त्यांचें सामान जाऊं दिलें. ते तेथें एका उच्च प्रतीच्या पथिकाश्रमांत जाऊन उतरले व कपडे बदलून त्यांनीं थोडा उपहार केला नाहीं तोंच वर्तमानपत्रांचे गुमास्ते त्यांच्या भेटीसाठीं हजर झाले. दुसऱ्या दिवशीं सर्व पत्रांतून सविस्तर असे लेख लिहिण्यांत आले व एका पत्रांत

'चार्लस ब्राडला–इंग्लंडचे भावी प्रेसिडेन्ट' असा शिरोलेख लिहिण्यांत आला होता. ज्याप्रमाणें कांहीं वर्तमानपत्रांनीं साहेबांची स्तुति केली त्याचप्रमाणें कांहीं धर्मविषयक पत्रांनीं त्यांची अत्यंत निर्भर्त्सना केली, परंतु या त्यांच्या कृतीस फारसें यश आलें नाहीं. त्यांस नानाविध संस्थांकडून आमंत्रणें आलीं. परंतु या खेपेस त्यांस व्हावा तसा फायदा झाला नाहीं. कांहीं कारणामुळें या वेळेस अमेरिकेंतील लोकांचीं मनें स्वस्थ नव्हतीं, व क्यान्सस मुक्कामीं यांस बरीच दुखापत झाली त्यामुळें त्यांच्या उद्योगास हरकत आली. तब्येत दुरुस्त झाल्यानंतर पुष्कळ ठिकाणीं व्याख्यानें देण्याचे त्यांनीं वायदे केले होते, परंतु इतक्यांत पार्लमेंट बरखास्त झाल्याचें वर्तवर्तमान त्यांच्या कानावर आलें तेव्हां ते एकदम आपली सभेंत योजना व्हावी या खटपटीसाठीं परत फिरले. परंतु ते येण्याच्या अगोदरच निवडणुकीचा निकाल झाला होता. ब्राडला साहेबांच्या पश्चात् त्यांच्या स्नेहीमंडळीनें बरीच धामधूम केली. परंतु त्यांस यश आलें नाहीं. तेव्हां दोहींकडून साहेबांची फसगत झाली. तिकडे जे वायदे मोडावे लागले त्यांबद्दल नुकसान भरून द्यावें लागलें आणि इकडेही उद्दिष्ट कार्य सिद्धीस गेलें नाहीं. तथापि या एका खेपेमुळें त्यांस दहा हजार रुपये कर्ज फेडतां आलें. त्यांस दर व्याख्यानास तीनशेंपासून पांचशें रुपये मिळत. कांहीं महिन्यानंतर फिरून अमेरिकेस जाण्याचा ब्राडला साहेबांनीं बेत केला, व जाण्यापूर्वींच व्याख्यानांचे दिवस नेमून ठेविले. परंतु नेमलेल्या वेळीं त्यांस जातां आलें नाहीं. त्याच सुमारास पार्लमेंटांत जागा खालीं झाली होती म्हणून ते राहिले. परंतु याही प्रसंगीं त्यांची योजना झाली नाहीं. तेव्हां ते अमेरिकेस गेले. या खेपेस त्यांची संभावना मनाप्रमाणें झाली. व्याख्यानांचे असंख्य प्रसंग झाले व लोकांत वहावाही विशेष झाली. मात्र प्रवासांत हाल फार झाले. वाटेनें नानातऱ्हेचे अपघात होऊन मोठे जिवावरचे प्रसंग आले. कधीं कधीं बर्फ पडल्यामुळें गाडीचा इतका खोळंबा होई कीं श्रोतृजन कंटाळून परत जात व व्याख्यानकार मागून येत असत. आठ आठ दिवसांत दोन दिवसांवर निद्रा घेण्यास सवड मिळूं नये असेंही कधीं कधीं होई.

एकंदरीनें त्यांची बरीच त्रेधा झाली; व जरी ते जात्या मोठे कंटक व शरीरानें मजबूत होते तरी त्यांस फार थकवा आला व विश्रांति घेण्याची फार उत्सुकता झाली ह्मणून ते परत आपल्या देशीं आले.

१८७५ सालीं पावसाळ्यांत ब्राडलासाहेब फिरून अमेरिकेस गेले. परंतु या खेपेस त्यांच्या नास्तिकमताबद्दल कांहीं लोकांनीं त्यांची बरीच निंदा केली व एकंदर लोकांचा ग्रह त्यांच्याविरुद्ध करण्याचा यत्न केला. तथापि या खटपटीपासून ब्राडला साहेबांचें फारसें नुकसान झालें नाहीं. कारण कीं त्यांचीं धर्मविषयक मतें अगोदरच जाहीर झालीं होतीं. तेव्हां या दोषैकदृक् मंडळीच्या प्रतिकूल आचरणानें त्यांची हानि झाली नाहीं. दोनचार प्रसंगीं मोठमोठ्या धर्मगुरूंनीं मोठ्या उदार मनानें यांस चांगला आश्रय दिला. परंतु या खेपेस ब्राडला साहेबांची प्रकृति एकाएकीं बिघडल्यामुळें त्यांचे सर्व विचार जेथल्या तेथें राहिले. त्यांस सान्निपातिक विकाराची भावना झाली व त्यांच्या जीविताचाही संशय उत्पन्न झाला. परंतु न्यूयार्क येथील लोकांनीं त्यांची चांगली शुश्रूषा केली, त्यामुळें ते दुखण्यांतून पार पडले. परंतु उद्दिष्ट व्याख्यानक्रम फिरून सुरू करण्याची त्यांच्या अंगीं ताकत नव्हती ह्मणून सुमार दहा संस्थानांमध्यें व्याख्यानें देण्याचे केलेले करार त्यांस मोडावे लागले व यामुळें त्यांचें सुमार पंधरा हजार रुपयांचें नुकसान झालें. लंडनास परत आल्यावर सेक्युलर सोसाइटीच्या मंडळीनें त्यांच्या सन्मानार्थ एक मोठा समारंभ केला व वर्गणी करून त्यास दोन हजार रुपयांची थैली नजर केली.

याच सुमारास मिसेस बेझांट यांशीं यांचा परिचय झाला. या बाईचा विवाह रेव्हरंड फ्रांक बेझांट नांवाच्या एका धर्माचार्याशीं झाला होता, व बाईच्या वशिल्यानेंच त्यांच्या यजमानांस धर्माध्यक्षाची जागा मिळाली होती. धर्मग्रंथांचें अवलोकन करण्याचा या बाईस मोठा नाद होता, व हें अवलोकन मोठ्या बारकाईनें त्या करीत असत तेव्हां कांहीं विसंगत गोष्टी त्यांच्या दृग्गोचर झाल्या व त्यांच्या श्रद्धेस धक्का पोंहोंचला. यजमानांचा तर धंदा धर्मोपदेश करण्याचा व यांची तर त्या धर्मावरील श्रद्धा शिथिल होत चालली तेव्हां त्यांस मोठी

पंचाईत येऊन पडली. परंतु अविमृश्यकारित्वाचा दोष आपल्यावर येऊं नये ह्मणून त्यांनीं सर्व मतांच्या धर्मग्रंथांचें सूक्ष्म दृष्टीनें परिशीलन आरंभिलें. ग्रीक, रोमन, ऑंग्लिकन व ल्यूथरन या पंथांतील भेद काय हें समजण्या करितां त्यांनीं पुष्कळ ग्रंथ चाळले. प्राचीन पंथांचीही माहिती त्यांनीं मिळविली. महम्मदीय, बौद्ध व हिंदु धर्मांच्या तत्वांविषयींही त्यांनीं शोध केला. त्याचप्रमाणें डार्विन, जॉन स्टुअर्ट मिल वगैरे प्रसिद्ध शास्त्रज्ञ विद्वानांचे ग्रंथ त्यांनीं पाहिले. परंतु या सर्व परिश्रमामुळें त्यांची श्रद्धा दृढ न होतां शिथिल होत चालली. तेव्हां परंपरागत धर्मावर विश्वास ठेवणाऱ्या अशा गृहस्थाशीं त्यांचा निभाव कसा लागावा ? अखेरीस १८७३ सालीं कायदेशीर लेख तयार करून त्या अन्वयें ही स्त्रीपुरुषें विभक्त झालीं. याप्रमाणें या बाईस अल्पवयांतच केवळ सत्याचें अवलंबन व मिथ्यावादाचा द्वेष यांमुळें आप्त बंधुजनांचा स्नेह तोडावा लागला, ऐहिक सुखास पराङ्मुख व्हावें लागलें, व पोटाशीं तान्हें बाळ घेऊन क्षुधाकुल व शीतार्त असें भटकावें लागलें. अशा स्थितींत टामस स्कॉट नांवाच्या एका गृहस्थानें त्यांस हस्तावलंब दिला. त्यांनीं यांस कांहीं लेख लिहावयास सांगून त्याबद्दल पैसे द्यावे, व एरव्हींही त्यांचा समाचार घ्यावा. पुढें पुढें या बाईनीं केलेले नास्तिक मतप्रतिपादक ग्रंथही छापण्याचें त्यांनीं पत्करिलें. याप्रमाणें या बाईनीं आपला चरितार्थ चालविला. सकाळपासून संध्याकाळपर्यंत पोटांत अन्न नसतांही ब्रिटिश म्यूझिअममध्यें बसून यांनीं पुस्तकावलोकन करावें व संध्याकाळीं स्काट साहेबांकडे जाऊन बसावें. या साहेबांच्या कळकळीमुळें व त्यांच्या उत्साहप्रेरक भाषणानें या बाईच्या सर्व श्रमांचा परिहार होई व त्यांस अविरतउद्योग करून स्वमतप्रतिष्ठापनाविषयीं उत्सुकता प्राप्त होई. एक दिवस ईश्वराच्या अस्तित्वाविषयीं कांहीं लेख लिहीत असतां "न्याशनल रिफार्मर" पत्राचा एक अंक त्यांच्या पहाण्यांत आला. या अंकांत "स्वतन्त्र विचार" मताच्या अनुयायिमंडळीस "न्याशनल सेक्युलर सोसाइटी" नांवाच्या समाजाचे सभासद होण्याविषयीं निमंत्रण होतें. तेव्हां सभासद होण्याचें बाईच्या मनांत आलें. परंतु सभासद होण्यापूर्वी

त्यांनीं समाजाच्या अध्यक्षांस पत्र लिहून विचारिलें कीं सभासद होणाऱ्यास आपण अनीश्वरवादी आहों अशी प्रतिज्ञा करावी लागते किंवा काय ? तेव्हां या विषयाचें विवेचन करण्यासाठीं यांची व ब्राडला साहेबांची प्रथमच मुलाकात झाली तेव्हां साहेबांस बाईच्या विद्वत्तेचें व बुद्धिमत्तेचें फारच नवल वाटलें; व पुढें थोड्याच दिवसांनीं त्यांस या बाईचें एक भाषण ऐकण्याचा प्रसंग आला तेव्हां तर त्यांच्या विषयीं साहेबांचा ग्रह फारच अनुकूल झाला. तेव्हां त्यांनीं यांस " न्याशनल रिफार्मर " पत्रांत लेख लिहिण्याविषयीं विनंति केली व त्यांच्या पूर्व प्रस्तुत उद्योगास प्रत्यवाय न यावा ह्मणून 'एजाक्स' या सहीनें लेख लिहिण्यास त्यांस सांगितलें. ब्राडला साहेब अमेरिकेंत असतांना बेझांट बाईनीं स्वदस्तूरचे लेख लिहिण्याचा व व्याख्यानें देण्याचा उपक्रम केला. परंतु या गोष्टीमुळें त्यांच्या यजमानांस फार राग आला. नवरा बायको विभक्त झालीं तेव्हां असा करार झाला होता कीं त्यांची लहान मुलगी आईजवळ असावी व तिनें वर्षांतून एक महिना बापाजवळ रहाण्यास जावें. याप्रमाणें वहिवाट सुरू होती. परंतु हा क्रम अबाधित चालला नाहीं. एका प्रसंगीं मुलगी आपल्या घरीं आली असतां बापानें तीस परत पाठविली नाहीं. त्यामुळें तंटा उपस्थित झाला व सरकारदरबार करण्याची पाळी आली. तेव्हां ब्राडला साहेबांनीं हरवक्त बाईस चांगली सल्ला मसलत दिली. त्यामुळें दोघांचा संबंध विशेष निकट झाला. परंतु या शिवाय दुसरा एक प्रकार झाला त्यामुळें त्यांचा स्नेह अगदीं दृढ झाला. तो प्रकार असाः—

डाक्टर नाल्टन या नांवाच्या एका अमेरिकन चिकित्सकानें " फ्रूट्स ऑफ फिलासफी " नामक एक लहानसा ग्रंथ लिहून अमेरिकेंत प्रसिद्ध केला. तेथें तो ग्रंथ फार लोकप्रिय होऊन त्याच्या लाखों प्रति खपल्या. १७९८ सालीं रेव्हरंड माल्थस या नांवाच्या गृहस्थानें 'लोकसंख्येच्या वृद्धीचे नियम' या विषयावर एक लेख लिहिला होता. हे गृहस्थ अर्थशास्त्रांत फार प्रवीण होते. त्यांच्या लेखाचें मुख्य धोरण असें होतें कीं लोकसंख्या नेहमीं भूमितिश्रेढीनें वाढत असते व उपजीविकेचीं साधनें गणितश्रेढीनें वाढत असतात. लोकसंख्येस प्रतिबंधक असे

दोन कारणसमवाय त्यांनीं गणिले. ( १ ) प्रत्यक्ष व ( २ ) अप्रत्यक्ष. प्रत्यक्ष कारणसमवायांत हरतऱ्हेनें घडत असलेल्या मृत्यूंचा समावेश होतो. उदाहरणार्थ लढाया, दुष्काळ, रोगराई, उपासमार, बालहत्या, खून, मारामारी इत्यादि गुन्हे, या सर्वांपासून होत असलेल्या मृत्यूंच्या योगानें लोकसंख्या कमी होते. अप्रत्यक्ष कारणसमवायांत प्रजोत्पत्ति न होऊं देण्याविषयीं जे उपाय योजावयाचे त्यांचा समावेश होतो; उदाहरणार्थ उशीरां लग्न करणें, स्त्रियांशीं संबंध करण्याविषयीं विवेक राखणें वगैरे. डाक्टर नाल्टन यांनीं आपल्या पुस्तकांत या दुसऱ्या वर्गांत येण्याजोगे कांहीं उपाय सुचविले होते. ह्मणजे विवाहित स्त्रीपुरुषांचा संबंध झाला असतांही गर्भ न रहावा अशा विषयीं कांहीं औषधोपचार त्यांनीं सांगितले होते. हें पुस्तक १८३३ सालीं प्रथम इंग्लंड देशांत प्रसिद्ध झालें व ४० वर्षेंपर्यंत त्या पुस्तकाविषयीं कोणींच हरकत घेतली नाहीं. १८७५ सालीं या पुस्तकाची नवी आवृत्ति चार्लस वाट्स यानें काढिली. १८७६ सालीं ब्रिस्टल मुक्कामीं एका मनुष्याजवळ कांहीं अप्रशस्त लेख सांपडल्यावरून त्यास शिक्षा झाली. त्या लेखांमध्यें डॉक्टर नाल्टन यांच्या पुस्तकाच्या प्रती होत्या तेव्हां या पुस्तकाकडे अधिकाऱ्यांचें लक्ष गेलें व त्यांनीं तें प्रसिद्ध करण्याची मनाई केली. चार्लस वाट्स यांनीं निमूटपणें तो हुकूम मान्य केला. परंतु ही गोष्ट ब्राडलासाहेब व बेझांट बाईस कबूल झाली नाहीं. चार्लस वाट्स हे "न्याशनल रिफार्मर" पत्राचे प्रकाशक होते व शिवाय स्वतंत्रविचारप्रवर्तक मंडळीच्या तर्फेंही कांहीं लेख यांनींच प्रसिद्ध केले होते. त्याचप्रमाणें ब्राड्ला साहेब व बेझांट बाई यांनीं रचिलेले पुष्कळ ग्रंथ यांनीं छापून प्रसिद्ध केले होते. तेव्हां अशा प्रकारचा ज्याच्याशीं आपला निकट संबंध अशा गृहस्थानें पाऊल मागें घ्यावें ही गोष्ट साहेबांस व बाईस श्लाघ्य वाटेना. हें एक कारण व दुसरें असें कीं अशा रीतीनें सरकारी अधिकाऱ्यास वाटेल तो ग्रंथ दडपून टाकूं दिला असतां ग्रन्थप्रकाशनाचें स्वातंत्र्य नष्ट होईल व शास्त्रीय ग्रन्थ करण्यास लोक तयार होणार नाहींत. यांच्यामतें या ग्रंथांत वावगें कांहीं नसून केवळ शास्त्रीय विषयाचें विवेचन आहे तेव्हां अश्लील लेखास लागू असलेला कायदा यास लागू

नाहीं. अशा सर्व गोष्टी मनांत आणून त्यांनीं सरकाराशीं भांडण्याची तयारी केली. तें पुस्तक आपण स्वतः छापून स्वतः विकण्यास आरंभ केला. पोलिस व इतर अधिकाऱ्यास अमुक स्थलीं अमुक वेळीं हीं पुस्तकें आपण स्वतः विकणार अशी वर्दी दिली. पुस्तकें घेण्यास सर्वांस सोय व्हावी ह्मणून किंमत सहा पेन्स ठेविली. पोलिसास वर्दी पोहोंचली; तेव्हां कांहीं अधिकारी पुस्तकें घेण्यास आले. विक्री सुरू झाल्यापासून वीस मिनिटांत ५०० प्रती खपल्या व कांहीं वेळानें आणखी तीनशें–मिळून एकंदर ८०० प्रती खपल्या. शिवाय पुडकींच्यापुडकीं बाहेरगांवीं पाठविलीं होतीं. याप्रमाणें पोलिसाकडून बंदी होण्यापूर्वींच पुस्तकाच्या एक लाख बारा हजार प्रती खपल्या व खटला सुरू झाल्यावर तर कहरच उडाला. जनसमाजाचें कुतूहल वृद्धिंगत झालें व खटल्याचा हेतु एक पण परिणाम विपरीतच झाला. खटला सुरू करितांना सालिसिटर जनरल यांनीं भाषण केलें त्यांत त्यांचा मुख्य मुद्दा असा होता कीं ह्या पुस्तकांत जरी विवाहित स्त्रीपुरुषांनाच उपदेश केला आहे तथापि त्याचा परिणाम भलताच होईल. ज्या अविवाहित स्त्रिया गर्भ रहाण्याच्या भीतीनें पुरुषांशीं संग वर्ज करितात त्यांस या पुस्तकाच्या योगानें मोठीच मदत होईल व व्यभिचार वाढेल. दुसरा मुद्दा असा कीं पुस्तकाची किंमत फारच अल्प ठेविल्याकारणानें हलक्या लोकांसही तीं उपलभ्य होतील. ज्या पुस्तकांचा केवळ शास्त्र प्रतिपादन करण्यांचा हेतु असतो त्यांची किंमत जबर असावी ह्मणजे केवळ तत्वान्वेषणपर लोकांसच त्यांचा उपयोग करितां येतो. मिसेस बिझांट व ब्राडला साहेबांनीं मोठ्या कुशलतेनें सर्व मुद्दे मोडून काढिले. खटला पांच दिवस चालला. बिझांट बाईनीं प्रथम १०–१२ कलाक अस्खलित व मुद्देसूद भाषण केलें. त्यायोगानें न्यायाधिकारी व पंच यांचीं मनें बरींच वेधून गेलीं. यानंतर ब्राडला साहेब यांनीं शास्त्रदृष्ट्या आपल्या पक्षाचें समर्थन केलें. अखेरीस फिरून दोघांचींही भाषणें झालीं. या दोघांनीं आपल्या भाषणांत असें सिद्ध करून दाखविलें कीं अशा प्रकारचें पुस्तक प्रसिद्ध करण्याचा हेतु वाईट नसून स्तुत्य आहे, व या पुस्तकांतील उपदेश जर लोकांनीं घेतला तर त्यापासून नुकसान

न होतां व अनीति न वाढतां लोकसंख्येच्या वृद्धीस प्रतिबन्ध होऊन देशाचें दारिद्र्य नाहींसें होईल, गुन्हे कमी होतील, शान्तता व संपत्ति वाढेल. ज्या पुरुषास दोन माणसांचेंच पोट भरण्याचें सामर्थ्य त्यास निरुपायामुळें संतति झाली असतां त्या संततीचें संगोपन करण्यास त्यास सवड नसते व त्यामुळें उपासमर होऊन मुलें रोगी व अशक्त निपजतात व त्यांच्यामध्यें उत्साह व बुद्धीचें चापल्य येत नाहीं. अशा प्रकारची संतति झाली ह्मणजे केवळ कुटुंबाचाच ऱ्हास होतो असें नाहीं, तर परंपरेनें देशाचेंही अकल्याण होतें, असें चिझांट बाईनीं मोठ्या आवेशानें, मनोहर भाषेनें व हृदयंगम वाक्यरचनेनें प्रतिपादिलें. शिवाय त्यांनीं असें सांगितलें कीं १८६८ सालीं लंडन शहरांत सोळा हजार धायकांनीं आपल्या बालकांची हत्या केली. तेव्हां असा प्रकार या पुस्तकांत दिलेला उपदेश प्रचारांत आला असतां होण्याचा संभव नाहीं. विवाहानंतर संततीचें लचांड पाठीमागें लागेल या भयास्तव सुशिक्षित लोक लग्न करीत नाहींत त्यामुळें पुष्कळ स्त्रिया अविवाहित रहातात; व त्या तशा राहिल्यानें निरुपायास्तव त्यांची व्यभिचाराकडे प्रवृत्ति होते. परंतु विवाह झाला असतांही गर्भाचा प्रतिबंध करण्याचे उपाय जर लोकांस उपलब्ध होतील तर विवाहाची एक मोठी आडकाठी दूर होईल व तरुण लोक विवाह करण्यास तयार होतील व तरुणीजनासमवेत गृहस्थाश्रमापासून होणाऱ्या असंख्य लाभांचा उपभोग घेतील. याच मुद्यासंबंधानें ब्राडला साहेबांनीं सोपपत्तिक असें प्रतिपादन केलें कीं, स्त्री व पुरुष यांस योग्यकालीं परस्पर संबंध आवश्यक आहे व नैसर्गिक इच्छेचा अवरोध केल्यानें नानाविध रोग उद्भवतात. शिवाय त्यांनीं असें दाखविलें कीं या पुस्तकांत जें शास्त्रीय विवेचन आलें आहे व ज्याच्या अश्लीलत्वाविषयीं अधिकाऱ्यांचा मोठा कटाक्ष आहे त्या विवेचनापेक्षांही स्पष्ट व बीभत्स असें वर्णन वैद्यकाच्या ग्रंथांत आढळतें. पुस्तकमूल्याच्या अल्पतेबद्दल जो मुद्दा होता तोही त्यांनीं समर्पक रीतीनें मोडून काढिला. आपल्या प्रतिपादनाच्या पुष्ट्यर्थ त्यांनीं नाना ग्रंथांतील वाक्यें काढिलीं. याप्रमाणें या दोघांनीं मनोभावेंकरून व अश्रांतपरिश्रम करून केवळ ग्रंथस्वातंत्र्याचें रक्षण

ण्यावें या हेतूनें सरकाराबरोबर टक्कर मारिली. परंतु वादनिर्णय सर्वांशीं यांस अनुकूल झाला नाहीं. पंचांनीं एवढें कबूल केलें कीं हा ग्रंथ प्रसिद्ध करण्यांत यांचा हेतु वाईट नव्हता परंतु त्यांचें असें मत पडलें कीं हें पुस्तक वाचून जनांस नीतिभ्रष्ट करण्यास कारणीभूत होईल. यामुळें न्यायाधिकाऱ्यांनीं सहा महिन्यांची कैद व २०० पौन्ड दंड अशी शिक्षा दिली. ब्राडलासाहेबांनीं वरिष्ट कोर्टांत तपासणीसाठीं अर्ज केला. तेथें खालच्या कोर्टांत काम चालविण्याच्या रीतींत कांहीं दोष ब्राडलासाहेबांनीं नजरेस आणिला त्यामुळें शिक्षा रद्द झाली. या कामांत खर्च बराच झाला परंतु तो लोकांनीं वर्गणी करून भरून काढला. या दोघांविषयीं लोकांत इतकी पूज्यबुद्धि उत्पन्न झाली होती कीं गरीबगुरीबांनीं सुद्धां आपल्या मगदुराप्रमाणें वर्गणी दिली. या खटल्यांत जरी निकाल यांच्या तर्फे झाला नाहीं तरी यांची परहितनिरति व आत्मनिरपेक्षता पाहून लोकांनीं फार वाहवा केली.

याच सुमारास ब्राडलासाहेब व बिझांटबाईनीं राजघराण्याच्या पुरुषांस मिळत असलेल्या ननरुयाबाबद तक्रार चालविली.. राज्ञीपुत्र प्रिन्स आफ वेल्स यांनीं जी हिंदुस्थानाची सफर केली तिच्यासाठीं खर्चाची नेमणूक झाली तेव्हां अशा रीतीनें पैशाचा अपव्यय होऊं नये ह्मणून एक जंगी अर्ज तयार करून त्यावर एक लक्ष लोकांच्या सह्या मिळविल्या होत्या. यावरून त्यांचें लोकांत वजन किती होतें हें व्यक्त होतें.

१८७५ सालीं ब्राडलासाहेबांचें कर्ज फिटून त्यांचें मन स्वस्थ झालें. हें कर्ज कसें फिटलें याची हकीकत ध्यानांत ठेवण्याजोगी आहे. टयूबरव्हिल नांवाच्या एका गृहस्थानें मृत्युपत्रांत ब्राडलासाहेबांस कांहीं रक्कम देण्याविषयीं लिहून ठेविलें. याचें कारण काय? त्यांचा यांचा स्नेह नाहीं, संबंध नाहीं, परिचयही नाहीं. परंतु केवळ या पुरुषाचे सत्यनिष्ठा व परहितदक्षता हे जे अलौकिक गुण त्यांची किंमत जाणूनच या गृहस्थांनीं त्यांच्या नांवावर ही रक्कम ठेविली. परंतु हीही रक्कम त्यांस निर्वेधपणें प्राप्त झाली नाहीं. या गृहस्थाच्या मृत्यूनंतर वर निर्दिष्ट केलेल्या मृत्युपत्राशिवाय दुसरींही कांहीं मृत्युपत्रें बाहेर पडलीं. त्यामुळें तंटा उपस्थित झाला व असेरीस आपसांत तोड होऊन ब्राडला साहेबांस

२५०० पौंड मिळाले. या योगानें त्यांच्या सर्व कर्जाची तजवीज लागली व पुढें त्यांस स्वस्थ चित्तानें व अधिक उत्साहानें जनहिताचीं कामें करण्यास सवड मिळाली. नंतर त्यांनीं कमी भाड्याची घेतलेली जागा सोडिली, व आपल्या मुलींसह ते बिझांटबाईच्या शेजारीं जाऊन राहिले.

१८७७ पासून १८८० सालापर्यंत आमच्या चरित्रनायकाच्या आयुष्यक्रमांत विशेष सांगण्यासारखें कांहीं घडलें नाहीं. लिहिण्याचें व बोलण्याचें काम जारीनें चालू होतें; परंतु कोणत्याही प्रकारची धामधूम करण्याचा त्यांस प्रसंग आला नाहीं. या कालापूर्वी त्यांनीं जे श्रम केले त्याच्या मोबदल्यादाखल त्यांस इतकीशी स्वस्थता मिळाली. यांत मोठें आश्चर्य नाहीं. प्रजाजनांस ते अत्यंत प्रिय होऊन राहिले होते. सर्व प्रसंगीं सल्लामसलत देण्यास ते तयार असत इतकेंच नव्हे तर कायावाचामनेंकरून त्यांच्या दुःखाचें निवारण करण्यास ते तत्पर असत. कधीं शेतीवाडी करणाऱ्या लोकांत, कधीं खाणींमधून काम करणाऱ्या लोकांत, कधीं इतर धंद्यांच्या लोकांत ते मिसळत. कधीं त्यांनीं त्यांचे आपसांतील तंटे मिटवावे, कधीं त्यांच्या धंद्याविषयीं शास्त्रीय माहिती द्यावी, कधीं त्यांची दाद अधिकाऱ्यांपर्यंत पोहोंचवावी, कधीं त्यांचे अग्रणी होऊन जाहिरसभा भरवाव्या. अशा नाना प्रकारांनीं ते आपल्या ज्ञानाचा, आपल्या बुद्धीचा, आपल्या वजनाचा उपयोग लोकांस करून देत. फावल्या वेळेस ख्रिस्ती मतप्रवर्तकांशीं युद्ध जुंपण्यासही ते मागें घेत नसत. शिवाय प्रसंग आल्यास राजकीय विषयांचीही चर्चा हे करीत. तुर्कस्थानाशीं लढाई चालली असतां तुर्क लोकांस मदत करण्याविषयीं वाटाघाट करण्याच्या हेतूनें हाईडपार्क येथें सभा भरली होती. ब्राडला साहेबांचें मत लढाई चालू ठेवावी असें नसून तह करावा असें होतें. तेव्हां त्यांनीं दुसरी एक सभा त्याच जागीं भरविली व सभेचें काम मनाप्रमाणें शेवटास नेलें; परंतु सभा बरखास्त होण्यापूर्वी प्रतिपक्षाकडील लोकांच्या सांगण्यावरून कांहीं बदमाष लोकांनीं मारामारी आरंभिली. ब्राडलासाहेबांवर सर्व प्रकारच्या अस्त्रांचा प्रयोग झाला. त्या समयीं त्यांचें अतुल बलच त्यांस उपयोगीं पडलें, नाहीं तर त्यांच्या प्राणावरच बेतली होती. त्यांच्या डाव्या हातास जखम झाली व त्यामुळें तीन वार

ते फार हैराण होते. शत्रूच्या पक्षाकडील पांच लोक एकट्या ब्राडलासाहेबांनीं जाया केले.

याप्रमाणें सर्व कांहीं यथास्थित चाललें होतें; परंतु त्यांचा जो श्रेष्ठ हेतु तो सिद्धीस जाण्याचा राहिला होता. आतांपर्यंत त्यांनीं तीन वेळ पार्लमेंट सभेंत प्रवेश होण्याविषयीं खटपट केली; परंतु त्यांस यश आलें नाहीं. तथापि त्यांनीं आपला उद्योग सुरूच टेविला होता. नॉर्थाम्प्टन येथें वारंवार जाऊन त्यांनीं लोकांचा परिचय दृढ केला व आपली योग्यता त्यांच्या नजरेस अधिक अधिक आणिली. अखेरीस १८८० सालीं निवडणुकीचा प्रसंग आला. तेव्हां सर्व जुळवाजुळव नीट झाली; परंतु ख्रिस्तीधर्मोपदेशक मंडळीनें त्यांच्याविरुद्ध खटपट सुरू केली त्यामुळें त्यांची निवडणूक होते किंवा नाहीं याबद्दल त्यांस संशय उत्पन्न झाला. अशा प्रकारच्या नास्तिकाची निवडणुक होणें श्रेयस्कर नाहीं असा जाहीर उपदेश करण्यांत येऊं लागला. एक श्रद्धालु रथकार लिव्हरपुलाहून नॉर्थाम्प्टन मुक्कामीं केवळ याच कामासाठीं आला. त्यानें आपल्या खर्चानें दहा हजार हस्तपत्रकें छापविलीं व एका दिवशीं तिकिटांसाठीं तीनचारशें रुपये खर्चून गांवोगांवीं टपालमार्गानें रवाना केलीं; परंतु या सर्व प्रतिकूल कृत्यांचा कांहीं उपयोग झाला नाहीं. इतक्या सर्व हरकती असतांही ब्राडला साहेबांस यश आलें. बारा वर्षे जो त्यांनीं उद्योग चालविला होता त्या दीर्घतपाचें त्यांस फल प्राप्त झालें.

परंतु एवढ्यानेंच कार्यभाग आटपला नाहीं. या पुरुषाच्या आयुष्यक्रमांत कोणतीही गोष्ट सुरळीत व अनायासें झाली असें दिसत नाहीं. यांचा दैवयोगच कांहीं विचित्र होता! अथवा असें होतें म्हणूनच त्यांचा कीर्तिप्रदीप इतका प्रज्वलित राहिला आहे. जर सर्व त्यांचे इष्ट हेतु अल्पायासानें सिद्धीस गेले असते तर त्यांच्यामधील अलौकिक गुणांचा प्रत्यय लोकांस आला नसता व ते इतके संमाननीय व पूज्य वाटले नसते. त्यांस पदोपदीं प्रत्यवाय येत होते म्हणूनच त्यांची हिंमत, त्यांची कार्यक्षमता, उद्योगप्रवणता, प्रजापक्षपातित्व, बुद्धिप्रागल्भ्य, साहसिता वगैरे गुण निदर्शनास आले. जे प्रसंग आतांपर्यंत येऊन गेले तेवढ्यांवरच मजल संपली नाहीं. अजूनही त्यांचा परीक्षाकाल अवशिष्ट

होता. लोकांनीं त्यांची निवडणूक केली तेव्हां प्रवेशरूप कार्याचें एक अंग झालें. परंतु सभेचे जे कांहीं विहित असे आचार आहेत त्यांप्रमाणें शपथ घेतल्यावांचून उमेदवाराचा सभासद बनत नाहीं. ब्राडला साहेब पडले नास्तिक; तेव्हां ते शपथ घेण्यास प्रथम नाकबूल होते व केवळ प्रतिज्ञापूर्वकच दीक्षा घेण्यास ते तयार होते. याबद्दल बरीच भवतिनभवति झाली, परंतु ठराव कांहींच होईना. नवा कायदा करण्याचीही कांहीं सभासदांनीं सूचना केली. परंतु ती मान्य झाली नाहीं. पुढें केवळ शपथ घेतलीच पाहिजे ह्मणून शपथ घेतों परंतु शपथेचा जो मंत्र त्यांतील अर्थानें आपण बांधले जाणार नाहीं असें म्हणून ते शपथ घेण्यासही राजी झाले. तेव्हां नास्तिकानें शपथ घेतली असतां ईश्वराची अवज्ञा होईल असा कोटिक्रम करण्यांत आला. शिवाय राजघराण्याविरुद्ध त्यांनीं कांहीं लेख लिहिले होते ह्मणून राजनिष्ठेची शपथ त्यांस घेतां येत नाहीं हाही एक मुद्दा होता. ग्लाडस्टन साहेब व ब्राईट साहेब यांच्या तर्फेचे होते; परंतु विरुद्ध पक्षाचे लोक फार असल्याकारणानें यांचें कांहीं चालेना. एका प्रसंगीं ब्राडला साहेबांनीं आपलें ह्मणणें काय आहे हें कळविण्याची परवानगी मागितली. ती परवागी त्यांस मिळाली. परंतु भाषण संपल्यावर त्यांस सभागृहांतून बाहेर जाण्यास सांगितलें. हुकूम गैरकायदेशीर म्हणून मान्य करीत नाहीं असें ते साफ बोलले; तेव्हां त्यांस पकडून नेऊन अटकेंत ठेविलें व दुसऱ्या दिवशीं सोडून दिलें. नंतर पहिल्या जुलैला ग्लाडस्टन साहेबांनीं अशी सूचना केली कीं निवडलेल्या सभासदांस मर्जी वाटल्यास शपथ न घेतां केवळ प्रतिज्ञेवरच निर्वाह करितां यावा. या सूचनेविरुद्ध पुष्कळ लोकांनीं सरमरीत भाषणें केलीं; परंतु बहुमतानें शेवटीं ती सूचना पसंत झाली व तिच्या अन्वयें दुसऱ्या जुलैला ब्राडलासाहेब स्थानापन्न झाले. त्यांची निवडणूक दुसऱ्या एप्रिलला झाली होती. परंतु या सर्व गोंधळांत तीन महिने गेले. याप्रमाणें पार्लमेंट सभेंत वाद चालला असतां लोकमत ब्राडलासाहेबांस विशेष अनुकुल होत चाललें. लोकांत चळवळ जास्त सुरू झाली. एका प्रसंगीं १५० वर सभा सर्व देशभर एका समयीं भरल्या व ब्राडलासाहेबांस सभेंतून दूर करूं नये अशाविषयीं ठरावं-

मद्वारां हजारों लेख ग्लाडस्टन साहेबांकडे आले. लेख इतके आले कीं एकट्या ग्लाडस्टन साहेबांस ते उघडून वाचण्याची सवड होईना ह्मणून लार्ड हार्टिंग्टन व हर्बर्ट ग्लाडस्टन यास त्या कामीं मदत करावी लागली. सभागृहाची जमीन तारांच्या लिफाफ्यांनीं भरून गेली. तेव्हां लोकांची खातरी झाली कीं ब्राडलासाहेबांस प्रजाजनांचें मोठें पाठबळ आहे.

सभेंत प्रवेश झाल्यानंतरही दोन तीन वर्षे ब्राडला साहेबांस बऱ्याच हालअपेष्टा भोगाव्या लागल्या. त्यांच्यावर निरनिराळया कारणांनीं फिर्यादी झाल्या व त्यांच्याविरुद्ध निवाडे झाले. एकदां तर त्यास पोलिसाच्या अधिकाऱ्यांनीं जबरीनें पकडून नेऊन मारहाण केली त्यामुळें ते कांहीं दिवस आजारी पडून राहिले, व फिर्याद केली तरी त्यांची दाद लागली नाहीं. शपथेबद्दलचा कायदा दुरुस्त करण्याविषयींही खटपट वारंवार झाली, परंतु तीस यश आलें नाहीं. दोन तीन वेळ त्यांची निवडणूक रद्द करण्यांत आली होती तथापि त्यांस नॉर्थम्प्टन-नच्या लोकांनीं फिरून निवडलें. ते शपथ घेण्यास तयार असतांही त्यांस प्रतिपक्ष्यांनीं हरकती केल्या. कांहीं लोक असे ह्मणत होते कीं शपथेचा कायदा दुरुस्त करण्याची खटपट केवळ ब्राडलासाहेबांसाठीं होत आहे. त्यांस त्यांनीं मोठें नामी उत्तर दिलें. ते म्हणाले:-" तुमच्यापेक्षां मला स्वतःला जास्त अभिमान आहे. सर्वसाधारण कायदा होत असल्यास मी आपली निवडणूक आपल्या खुषीनें रद्द करवीन. कायदा मंजूर झाला ह्मणजे मी फिरून प्रजाजनांचा अभिप्राय घेईन. त्यांस मी नालायक वाटलों तर ते खुशाल मला दूर करोत; परंतु तुह्मांला मी तसें करूं देणार नाहीं. आमरणांत मी या गोष्टींत माघार घेणार नाहीं." केवढी ही छाती व केवढा हा निश्चय! यांचा पक्ष सबळ करण्याकरितां एकदा ट्राफलगार स्क्वेअरमध्यें पन्नास हजार लोकांची सभा भरली होती. तेथें यांचें व दुसऱ्या कांहीं लोकांचीं भाषणें झालीं. यांस शपथ घेऊं देऊं नये ह्मणून ६२ हजार सह्यांच्या अर्ज्या आल्या, परंतु यांस अनुकूल अशा अडीच लाख सह्यांच्या अर्ज्या आल्या होत्या. जुलै-पासून सप्टेंबर महिन्यापर्यंत सभेपुढें साहेबांचीं २२ भाषणें झालीं होतीं.

याप्रमाणें प्रतिपक्ष्यांकडून त्यांचा सभेंत प्रवेश होऊं नये ह्मणून

नानाविध प्रत्यवाय करण्यांत आले होते ; परंतु त्या हिम्मतबहाद्दरानें गम न खातां एकसारखी टक्कर देऊन अखेरीस आपलें खरें केलें व हल्लीं ते निर्वेध पार्लमेंट सभेंत काम पहात आहेत. अशा उद्योगी पुरुषसिंहाला जयश्रीनें वरिलें यांत काय नवल! जयश्रीच्या प्रीतीस पात्र होण्याकरितां त्यानें तसेच श्रम घेतले होते; त्यानें तसेच आयास भोगिले होते; त्यानें मनोभावें करून तिची तशीच मनधरणी केली होती. जयश्रीची सामान्य स्त्रियांत गणना नाहीं. सामान्य स्त्रिया रूपाला भुलतात, चाटूक्तींनीं मोहून जातात, साधारण वशीकरणाच्या प्रयोगानें वश होतात. परंतु जयश्रीचा तसा प्रकार नाहीं. ती सत्यप्रिय आहे. ती खरा भाव व उपाधिनिरपेक्ष असा पराक्रम ओळखते व सतत परिश्रम, दीर्घ उद्योग व कार्यनिष्ठा ह्या गुणांनींच ती वश होते. तेव्हां यासारख्या नरवरावर ती प्रसन्न झाली यांत तिनें आपल्या ब्रीदाशीं अनुरूप असेंच वर्तन केलें. असो.

येथपर्यंत जें वृत्त कथन झालें त्यावरून आमच्या चरित्रनायकाचा उद्योग इंग्लंड व अमेरिका या दोन देशांतच जारी होता हें दिसून आलें. परंतु कोणी दोषैकदृक् असा आक्षेप घेईल कीं केवळ उच्चपदप्राप्तीच्या लोभानें त्यांनीं इंग्लंडांत श्रम केले व धनलोभानें अमेरिकेंत केले. हा जरी पूर्वपक्ष आह्मांस कबूल नाहीं, व जो कोणी या थोर पुरुषाच्या कृत्यांचा समदृष्टीनें विचार करील त्यासही तो कबूल होणार नाहीं; तथापि हा आक्षेप निरर्थक नाहीं असें घेऊन चाललें तरी त्याचें निराकरण या साहेबांच्या गतवर्षीं पार्लमेंट सभेंत चालू असलेल्या खटपटीनें होण्यासारखें आहे. पार्लमेंट सभेंत प्रवेश होण्यासाठीं आंग्ल देशबांधवांची सेवा, व द्रव्यार्जनासाठीं अमेरिकन बंधूंशीं स्नेह;–ठीक आहे. पण हतभाग्य भारतवर्षीय प्रजाजनांचा पक्ष स्वीकारून त्यांच्या तर्फेनें अप्रतिहत उद्योग करणें यांत काय हेतू? आमच्या निःसत्व जनपदाजवळ परकीयांस लोभ लावण्यास द्रव्य उरलें नाहीं, व पार्लमेंट संसदेंत सभासद निवडण्याचा आह्मांस हक्क नाहीं; तर मग हा जो या देशाच्या हिताविषयीं या साहेबांनीं खटाटोप मांडिला आहे त्याचें इंगित काय असावें? गेल्या वर्षीं आपल्या देशाच्या व्यवस्थेसंबंधानें

त्यांनीं अनेक प्रश्न उपस्थित करून त्यांयोगें अधिकारापन्न पक्षास जेरीस आणिलें. त्यापासून ब्राडलासाहेबांस काय लाभ? त्याचप्रमाणें हिंदुस्थानांतील कायदे करणाऱ्या सभांत लोकनियुक्त प्रतिनिधींचा प्रवेश व्हावा यासाठीं जो कायद्याचा मसुदा त्यांनीं तयार केला आहे व ज्यासंबंधानें विशेष माहिती मिळविण्यासाठीं त्या महात्म्यानें अस्वस्थ शरीरप्रकृतीकडे लक्ष न देतां या देशाची सफर केली, यांपासून त्यांस कोणती फलप्राप्ति? या महापुरुषानें अल्पवयापासूनच आपला देह लोककल्याणार्थ झिजविला आहे व त्याचा प्रस्तुतचा उद्योग हें तशाच प्रकारच्या वर्तनाचें असंदिग्ध प्रमाण आहे. तेव्हां या सर्व कार्यसमवायाचा इतर कारणांशीं संबंध जुळविणें हें केवळ क्षुद्र मनाचें द्योतक आहे. महापुरुषांच्या चरित्रविभूति निस्सीम असतात म्हणून त्यांस प्राकृत जनांचे निमय लागू होत नाहींत. तेव्हां या साहेबांनीं आजपर्यंत स्वदेशासाठीं व परदेशासाठीं जो उद्योग केला तो ते अव्याहत चालू ठेवितील यांत संदेह नाहीं. या सर्वांचें इंगित समजण्यास लांब जाणें नको. शिरोलेखांत लिहिल्याप्रमाणें "परोपकाराय सतां विभूतयः" हेंच त्याचें स्पष्टीकरण. असो.

आतां वर जे या पुरुषाच्या चरित्रांतील भाग संक्षेपरूपानें सांगितले त्यांपासून काय बोध घेण्यासारखा आहे याविषयीं दोन शब्द लिहून हा लेख समाप्त करूं. ब्राडलासाहेबांच्या घरची गरीबी व म्हणूनच उच्च प्रतीचें शिक्षण मिळण्याच्या साधनांचा अभाव, कष्टमय शरीरयात्रा, अल्पवयांतच दुःखमय संसारांतील क्लेशांचा अनुभव, स्वधर्मावर श्रद्धा नसल्यामुळें स्वजनविरोध व बहुजनसमाजाच्या निंदेस पात्रता, आणि नैसर्गिक शरीरसौष्ठवादि गुणांचा अभाव,—अशा स्थितींत जो मनुष्य वकिलाच्या शिपाईगिरीपासून चढत चढत पार्लमेंट सभेंतील अग्रगण्य असा सभासद झाला; ज्याचीं मतें व ज्याचे विचार पूर्वी तिरस्कृत असून आतां संमाननीय झाले आहेत; ज्याच्या नास्तिक मतांचा विटाळ कोंकशालाही सपन नसे परंतु ज्यास आतां सर्व प्रजाजनांच्या हृदयांत स्थान मिळालें आहे; ज्यास लत्ताप्रहार करून ज्याचा जीव घेण्यासही धर्माग्रही लोक तयार होते, परंतु आतां ज्याच्या प्रकृतीस अस्वस्थता झाल्याबरोबर

ख्रिस्त भक्त देखील आपल्या पवित्र उपासनामंदिरांत आरोग्य होण्याविषयीं प्रार्थना करितात; अशा या पुरुषाच्या चरित्रावरून सुधारलेल्या देशांनींही उपदेश घेण्यासारखा आहे. मग आमच्यासारख्या अवनत प्रजेस त्याचा उपयोग वर्णावा तितका थोडा. या चरित्राचा महामंत्र करून त्याचा जप करणें हें श्रेयःप्राप्तीचें साध सं ा े अतिशयोक्ति होणार नाहीं. ज्या अलौकिक गु ा ा प त्यास यशःप्राप्ति झाली त्यांपैकीं एखादा जरी लाभला तरी आमचा भस कार्यभाग होईल. स्वावलंबन, सत्यनिष्ठा, परकृत्यव्यसन, आत्मनिरपेक्षता, दृढनिश्चय, सतत प्रयत्न हे या पुरुषाच्या कीर्तिरूप इमारतीचे मुख्य स्तंभ. यांपैकीं एक एक गुण असला तरीही महत्कार्य होतें. मग समुदित असा गुणगण असल्यावर काय विचारावयाचें ? बाह्य उपकरणांचा पूर्ण अभाव असला तरी स्वतःच्या बळावर क्रियासिद्धि होते हें या चरित्रावरून अगदीं स्पष्ट होतें; अथवा असा नियमच आहे:

क्रियासिद्धिः सत्त्वे भवति महतां नोपकरणे ।

तेव्हां दुसऱ्याच्या तोंडाकडे न पाहतां आपण आपल्या प्रयत्नावरच अवलंबून रहावें. ज्या पक्षाच्या सत्यतेविषयीं खातरी असेल त्यापासून च्युत होऊं नये. आपल्या पोळीवरच तूप ओढण्याचें निंद्य काम न करितां देशहितास झटावें. एकदां हातीं घेतलेलें काम शेवटास न्यावें व विघ्नें आलीं असतां कार्यपराङ्मुख होऊं नये. अशा प्रकारचा अमोल्य उपदेश एकाच पुरुषाच्या चरित्रामधून उपलब्ध होणें कठीण. परंतु या नरपुंगवाच्या चरित्रांत तो प्राप्त होत आहे हेंच यांच्या महत्वाचें प्रमाण, हेंच यांच्या उदारचरितत्वाचें निदर्शन. अशा पुरुषाच्या गुणश्रवणानेंच सहृदयांच्या हृदयास आल्हाद व्हावयाचा. मग प्रत्यक्ष दर्शन झाल्यावर काय विचारावयाचें ? कवीनें म्हटलें आहे:

किं मधुना किं विधुना किं सुधया किं च वसुधयाऽखिलया ।
यदि हृदयहारिचरितः पुरुषः पुनरेति नयनयोरयनम् ॥